

# श्री साईलीला

या अंकांत—


- परमार्थ मार्गावरील तीन मारेकरी
- राष्ट्रीय उत्कर्ष साधूं या
- चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं !
- वैदिक मंत्रांचा विनियोग
- श्रीसाईनाथ हॉस्पिटल शिर्डी फंड
- रामराज्यांतील शासन व्यवस्था
- सुखाच्या शोधांत
- योगी अरविंदांचा कर्म योग
- श्रीगुरुपौर्णिमा उत्सव शके १८८८


मत ५० पैसे

ऑगस्ट १९६६

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू

सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं.
३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

अन्न म्हणजे परब्रह्म. सर्व भूतमात्रांची उत्पत्ति व गती त्यांत सामावलेली आहे. या जगांत जगण्याचें जर कोणतें साधन असेल तर तें म्हणजे अन्न हेंच होय. यावरून अन्नाचें महत्त्व समजून येईल. प्राणधारणा कशामुळें होते ? अन्नामुळेंच ना. आपल्या घरीं येळीं–अवेळीं कोणीही येवो. त्याला अन्न देऊन त्याचें जरूर समाधान करावें. अन्नदानाचें पुण्य फार मोठें आहे. अन्नदानाचें महत्त्व शब्दांनीं वर्णन करण्यापलिकडचें आहे. यांत सर्व आलें. या जगांत अन्नदानासारखें दुसरें महत्त्वाचें दान कोणतेंही नाहीं.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] ऑगस्ट १९६६ [ अंक ५ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

साईबाबा उपासतापास करण्याविरुद्ध होते. कोणीहि उपाशीं राहूं नये. जें कांहीं अन्न मिळतें तें घेऊन आत्माराम संतुष्ट व आनंदी ठेवावा. त्याला कधींही दुःखताप देऊं नये असें त्यांचें सांगणें असे.

या जगांत प्रत्येक माणूस नानाप्रकारच्या धडपडी, लटपटी व खटपटी करतो त्या कशासाठीं ? पोटासाठीं. ईश्वरानें प्रत्येकांच्यामागें पोटाचा प्रपंच लावून दिलेला आहे. त्यासाठीं तो नाना उद्योग व व्यापारधंदे करतो. कमी जास्त पैसे मिळवितो आणि स्वतःचें व कुटुंबाचें पालनपोषण करतो.

अन्नदानाचें फार मोठें पुण्य सांगितलें आहे. आपल्या शक्तीप्रमाणें कोणत्या ना कोणत्या रूपानें अन्नदान करावें. भुकेलेल्यांस दोन घांस द्यावे. दुपारच्यावेळीं आपल्या दारी कोणीहि येवो. त्याला भोजन दिल्याशिवाय विन्मुख दवडूं नये.

बाबा चार घरचें अन्न जमवून किंवा स्वतः हंडी शिजवून जे कोणी जवळपास असतील त्यांना प्रसाद म्हणून पोटभर जेऊं खाऊं घालीत असत. यावरून आपण योग्य तो बोध घेणें, जरूर आहे.

बाबा स्वतः कधींहि उपाशी रहात नसत व कोणालाही उपाशी राहूं देत नसत. यांतील रहस्य काय ? अन्नमय प्राण असें म्हटलें आहे. अन्न म्हणजे या जगांत जिवंत रहाण्याचें मुख्य साधन. त्या अन्नाची हेटाळणी करून कसें बरें चालेल ? उद्योग करा. पैसा मिळवा व त्याचा विनियोग स्वतःचें व आपल्यावर अवलंबून असतील त्यांचें रक्षण करण्यासाठीं करा. रक्षण करावयाचें म्हणजे काय करायचें ? पोट भरतां आलें नाहीं तर रक्षण कसें होणार ?

तुम्हांला या जगांत पुरुषार्थ गाजवायचा आहे. नांवलौकिक मिळवायचा आहे. देवाला जवळ आणायचा आहे. मग हे पराक्रम तुम्हीं उपाशीं पोटीं करणार आहांत का ?

बाबा सांगतात कीं, "देव न लाभे रित्यापोटीं। आधीं आत्म्याची करा संतुष्टी."—

बाबांचे हे शब्द प्रत्येकानें आपल्या हृत्पटलावर कायमचे कोरून ठेवण्या-सारखे आहेत.

अन्नानें आपल्या शरिराचें पोषण व संवर्धन होतें. शरीराच्या सहाय्यानें या जगांतील नाना घडामोडी आपणास करायच्या असतात. तें शरीर धडधाकट नसून लेचेपेचें व रोगट असलें तर आपण कोणाची सेवा करणार? नाहीं स्वतःची, नाहीं इतरे जनांची. देवानें हा देह दिला आहे तो अन्नाविणें सुकवून व रोडावून टाकण्यासाठीं नाहीं दिलेला. त्याचें चांगलें पोषण झालें पाहिजे. तो सदासर्वकाळ प्रफुल्लीत व टवटवीत असला पाहिजे. तरच त्याच्याकडून काम करवून घेतां येईल.

'सारांश सकळ इंद्रियां शक्ति। तरीच घडे देवाची भक्ति। जरी अन्नाणीण क्षीणत्वा येती। तरी त्यां न गतीं परमार्थी ॥'

बाबा तुम्हां आम्हांला किती महत्वाचा संदेश देऊन गेले आहेत? तोच संदेश त्यांनी जीवनभर आचरणांत आणिला.

यावरून आम्ही हाच बोध घ्यावयाचा कीं, अन्न म्हणजे परमेश्वर. इमानें इतबारें वागून तें अन्न आम्हीं प्राप्त करून घ्यावयाचें. त्याचा यशाशक्ति उपयोग स्वतःसाठीं करावयाचाच. परंतु जे कोणी हतभागी असतील त्यांनाही अन्नदानानें संतुष्ट करावयाचें.

उपवास करणें हितकारक नाहीं तसेच अति भोजनही हितकारक नाहीं. मिताहार, सात्विक आहार हाच कल्याणप्रद असतो.

त्याचबरोबर आपण हेंही लक्षांत बाळगलें पाहिजे कीं, आरोग्यासाठीं एकादे-दिवशीं उपवास करण्याची जरूरी भासली तर प्रसंगविशेषीं आपण आरोग्यास्तातर उपास केला पाहिजे.

अन्नग्रहण, अन्नदान या क्रिया जीवनांत फार महत्त्वाच्या आहेत. त्यांचें आचरण योग्य प्रमाणांत केलें पाहिजे.

आणि शेवटीं सांगायचें तें एवढेंच कीं, 'भुकेल्या पोटीं देव सांपडे। हें तों कल्पांतींही न घडे। उपास तापास यांचे सांकडें। चालेना इकडे साईशीं ॥"

—संपादक

# परमार्थ मार्गावरील तीन मारेकरी

—गुरुदेव रानडे

## आदर्श कर्मयोगी

भगवद्गीतेंतील तत्त्वास धरून श्रीज्ञानेश्वरांनीं आदर्श कर्मयोगी कर्म व अकर्म यांच्या समन्वयानें नैष्कर्म्य-सिद्धि कशी मिळवितो हें अनेक ठिकाणीं वर्णिलें आहे. चौथ्या अध्यायांत खऱ्या कर्मयोग्याची सूर्याशीं तुलना केली आहे : "सूर्य उगवतो व मावळतो म्हणून तो फिरतो असें वाटतें; परंतु वस्तुतः तो फिरत नाहीं. त्याप्रमाणें कर्म करीत असतांनाच कर्मयोगी नैष्कर्म्य तत्त्व आचरतो. सूर्याचें बिंब पाण्यांत बुडत नाहीं, त्याप्रमाणें कर्मयोगी मानवासारखा दिसला तरी तो वस्तुतः मानव नाहीं. तो न पाहतांच सर्व विश्व पाहतो; कांहींहि न करतां सर्व करतो; कांहींहि न भोगतां सर्व वस्तू भोगतो; एकाच ठिकाणीं बसला तरी सर्वत्र जातो; किंबहुना तो आपणच स्वतः सर्व विश्व होतो." या ठिकाणीं श्री ज्ञानेश्वरांनीं सूर्य फिरतोसा दिसला तरी खरोखर स्थिर आहे हें खगोलशास्त्रांतील मूळ तत्त्व सांगितलें आहे. सूर्य ग्रहमालेचें केंद्र असून त्याच्याभोंवती सर्व ग्रह फिरतात हा खगोलशास्त्रांतील शोध युरोपीय राष्ट्रांसहि लागला नव्हता, अशावेळीं संत श्रीज्ञानेश्वरांनीं हें तत्त्व स्पष्टपणें प्रतिपादिलें आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. असो. हें विषयांतर सोडून पुनः प्रस्तुत विषयाकडे वळूं. आदर्श कर्मयोग्यास नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त झाली असली तरीहि त्यास लोकांसाठीं कर्तव्य करावें लागतें, असें श्रीज्ञानेश्वर सांगतात. "आंधळ्यांच्या पुढें त्यांना वाट दाखविण्यासाठीं डोळस मनुष्य चालतो, त्याप्रमाणें अज्ञानी लोकांस कोणी तरी धर्म आचरून दाखवावा लागतो. ज्ञानी लोकांनीं याप्रमाणें अज्ञानी लोकांस खरा मार्ग दाखविला नाहीं तर त्यांना तो कसा समजणार? वडील माणसें जें जें करतात त्यासच धर्म हें नांव मिळतें व त्याप्रमाणें सामान्यजन आचरण करतात." "आईचें दूध ज्याला केवळ प्रयासानें पचतें अशा तान्ह्या मुलास पक्वान्न कसें द्यावयाचें? पक्वान्नें अशा मुलांसाठीं नसतात. त्याचप्रमाणें कर्में करण्याची सुद्धां ज्यांची पात्रता नाहीं, त्यांस निष्काम कर्माचा उपदेश थट्टेनें सुद्धां योग्यानें कधींहि करूं नये. त्यांना सत्कर्मेंच करण्यास सांगावें. त्यांच्यापुढें चांगल्या कर्मांचीच स्तुति करावी व तीं स्वतः योग्यानें त्यांना आचरून दाखवावीं. याप्रमाणें लोकसंग्रहासाठीं

योग्यानें कर्मे केलीं, तर तीं त्यास केव्हांहि बंधनकारक होत नाहींत. राजा किंवा राणी यांचीं सोंगें घेणारे बहुरूपी स्त्रीपुरुषभाव मनीं न आणतां लोकप्रसादन मात्र हुबेहूब करतात." म्हणून खऱ्या कर्मयोग्यानें दुसऱ्यांना सत्कर्माचरणाचा उपदेश करावा व आपण मात्र नैष्कर्म्याच्या शुद्ध आनंदांत स्थिर होऊन राहावें.

## कर्मापासून नैष्कर्म्य-प्राप्ति.

कोणत्या व कसल्या कर्मांचा उपदेश कर्मयोग्यानें लोकांना करावा याबद्दल श्रीज्ञानेश्वरांनीं अठराव्या अध्यायांत विस्तृतपणें सांगितलें आहे : "यज्ञ, दान, तपादिक आवश्यक कर्मे सर्वांनीं केलींच पाहिजेत. पुढें उमटलेल्या पावलांची वाट वाटसरूनें सोडूं नये; पैलथडीं गेल्याशिवाय नांव सोडूं नये; लोंगर लागल्याशिवाय केळीचें झाड तोडून टाकूं नये; हरवलेली वस्तु सांपडेपर्यंत हातांतला दिवा मालवूं नये; त्याप्रमाणें आत्मज्ञानाविषयीं पूर्ण निश्चितता आल्याशिवाय यज्ञादिक कर्मांविषयीं कोणी उदास होऊं नये. उलट, अधिकाराप्रमाणें साक्षेपानें तीं जास्तच आचरावीं. वाचेचा अतिरेक म्हणजेच मौन; त्याप्रमाणें कर्मातिशय म्हणजेच नैष्कर्म्य होय. सोनें फिरफिरून मुशींत घालून शुद्ध केलें म्हणजे त्यांतील सर्व मळ नाहींसा होऊन ते अत्यंत शुद्ध होतें. निष्ठेनें कर्म वारंवार करीत गेल्यानें रज व तम यांचा मळ झाडून जाऊन पूर्ण शुद्ध सत्त्वगुण अंगीं बाणतो. यासाठीं, हे धनंजया, ज्याला पूर्ण सत्त्वशुद्धि प्राप्त करून घ्यावयाची आहे त्यास कर्मे हीं निर्मळ व पवित्र तीर्थांप्रमाणें उपयोगी पडतात. पवित्र तीर्थानें बाह्यशुद्धि होते, तर कर्मानें अन्तःशुद्धि होते. मारवाडांत तहानेनें व्याकुळ झालेल्यास अमृतकुंड दृष्टीस पडावा, बुडत्याला नदीनेंच वांचवावें, पडणाऱ्यास पृथ्वीनेंच कळवळा येऊन सांवरावें, मरणाऱ्याची मृत्यूनें आयुष्यवृद्धि करावी किंवा रोग्यास रसायनविषानेंच वांचवावें, त्याचप्रमाणें कर्म करण्याची हातोटी ज्यास साधली तो कर्माच्या बंधनापासून मुक्त होऊन मोक्षांस पात्र होतो."

## कर्म व ज्ञान

कर्म व ज्ञान हीं भिन्न असल्याचें लोक अनादिकालापासून मानीत आले आहेत व श्रीज्ञानेश्वरहि भगवद्गीतेस अनुसरून कर्माचरण व ईश्वरज्ञान यांत फार मोठा भेद असल्याचें अनेक वेळां सांगतात. ज्ञानाच्या दृष्टीनें कर्म अगदींच क्षुल्लक आहे असें ते प्रतिपादितात. आश्रमधर्मांची कर्तव्यें चोखपणें केल्यामुळें जे स्वतः विधिमार्गाच्या कसोटीची शिळा बनले आहेत, यज्ञ केल्यामुळें ज्यांचें कौतुक करून तीनहि वेद मान डोलवितात, असे मूर्तिमंत यज्ञ बनलेले दीक्षित पुण्याच्या नांवानें पाप जोडतात! कारण, कल्पवृक्षाखालीं बसून झोळीस गांठी घालाव्या व भिक्षेस निघावें, त्याप्रमाणें हे दीक्षित यज्ञाचा मुख्य हेतु जो मी त्या मला विसरून व तिन्ही वेदांचें ज्ञान संपादून शेंकडों यज्ञ करतात व स्वर्ग मिळवितात! मजवांचून स्वर्ग

मिळविणें हा अज्ञान्यांचा पुण्यमार्ग आहे; ज्ञानी लोक त्यास उपसर्ग व हानि समजतात. नरकाच्या दुःखाशीं असलेल्या विरोधामुळें स्वर्गास सुख हें नांव मिळालें आहे. या दोन्हींपेक्षां माझें नित्यानंद व निर्दोष स्वरूप भिन्न आहे. मला येऊन मिळाल्यावर स्वर्ग व नरक या चोरांच्या आडवाटा आहेत हें समजतें. पुण्यात्मक पापानें स्वर्ग व पापात्मक पापानें नरक प्राप्त होतात, माझी प्राप्ति ज्यामुळें होते तें निर्मळ शुद्ध पुण्य होय. वस्तुतः ते माझ्यांत अंतर्भूत असून माझ्यापासून ते दुरावतात व त्यास पुण्य म्हणतात! असें असत्य बोलल्याबद्दल त्याची जीभ कां तुटत नाहीं? मला न जाणणें या पापरूपी पुण्यानें ते स्वर्गास जातात व हें पुण्य संपलें कीं त्यांचें इंद्रपण सुद्धां सरतें व ते पुनः मृत्युलोकांत येतात. वेश्याभोगामध्यें सर्व पैसा उधळल्यावर तिच्या दाराजवळहि जातां येत नाहीं, त्याप्रमाणें दीक्षिताचें आयुष्य अत्यंत लाजिरवाणें होतें. म्हणून पुढें त्याचें वर्णन करण्याची जरुरी नाहीं. मला न जाणतां त्रैलोक्याचें जरी ज्ञान झालें, तरी तें अगदीं व्यर्थ आहे; कारण, तें कण सोडून कोंडा पदरीं बांधण्यासारखें आहे. म्हणून मला जाणून तूं दुसरें कांहींहि जाणलं नाहींस तरी तूं सुखी होशील."

## कर्तव्य म्हणजेच ईश्वरी आज्ञा

याप्रमाणें कर्में करीत असतां अध्यात्म–प्रांतांत कसा प्रवेश मिळेल याबद्दल धर्मसार्गाच्या दृष्टीनें साधनें सुचविलीं आहेत. कर्तव्य म्हणून सर्व कर्में करण्याची संवय लावून घेतल्यानें कर्म बंधनकारक होत नाहीं. हें कर्मबंधनांतून सुटण्याचें पहिलें साधन होय. कर्तव्यनिष्ठा हें कर्ममार्ग न्याय्य असल्याचें पहिलें कारण होय. ज्ञानेश्वरीच्या तिसन्या अध्यायांत परमेश्वरानेंच लोकसंग्रहार्थ कर्म करण्यास प्रथम आज्ञा दिली व हें कर्म वर्णाश्रमाच्या गरजेप्रमाणें नियमित केलें असें सांगितलें आहे. तुम्ही आपलें कर्तव्य करा; फळाची आशा धरूं नका. व्रत, नियम करूं नका; तीर्थास जाऊन शरीर कष्टवूं नका. योगयागादिक सकाम कर्में करूं नका. मंत्रतंत्रादि विधानांच्या भानगडींत पडूं नका; इतर देवतांना भजूं नका. स्वधर्मांत सांगितला असेल तेवढाच यज्ञ करा. पतिव्रता ज्याप्रमाणें आपल्या पतीस भजते, त्याप्रमाणें निष्कामपणें आपल्या देवाची पूजा करा. तुम्ही स्वधर्माला भजाल तर तो तुमची कामधेनु होईल. याप्रमाणें धर्म-बंधनांतून मुक्त होण्यास कर्तव्य म्हणून कर्म करणें हा प्रथम मार्ग होय.

## अनासक्त कर्माचरण

कर्मांत कोणत्याहि प्रकारें न गुंततां कर्म करणें हा कर्मबंधनांतून सुटण्याचा दुसरा मार्ग होय. कर्म करीत असतां शेवटीं त्यांतून नैष्कर्म्यसिद्धि मिळवायची झाल्यास अनासक्ति हा एक उपाय दिसतो. आपल्या अंतःकरणावर कर्तेपणाचा पगडा बसूं न देतां महायागादि कर्में करावीं असें श्रीज्ञानेश्वरांनीं अठराव्या

अध्यायांत सांगितलें आहे. पैसे घेऊन यात्रेस गेलेला इसम यात्रेचें फळ आपणास मिळणार असा अभिमान बाळगत नाहीं; समर्थ राजाच्या मुद्रेनें एखादा राजास देखील हांकून लावूं शकेल, पण त्यामुळें आपल्या अंगीं तें सामर्थ्य आहे असा अहंकार त्यास वाटणार नाहीं; दुसऱ्याचा कांस धरून पोहणाऱ्याच्या ठायीं आपण पोहतों ही भ्रामक कल्पना राहत नाहीं किंवा यज्ञांत आपण मोठे दानशूर आहों असा आविर्भाव पुरोहित आणीत नाहीं. दाई दुसऱ्याच्या मुलास पोसते त्याप्रमाणें फलाविषयीं निराश असावें. पिंपळाचीं फळें मिळावी म्हणून कांहीं पिंपळास कोणी पाणी घालीत नाहीं. आपल्यास दूध मिळेल या आशेनें कांहीं गुराखी गुरें राखीत नाहीं. त्याप्रमाणें फळाची आशा न ठेवतां कर्में करावीं. अर्जुना, कर्म व नैष्कर्म्य यांविषयीं हा माझा संदेश आहे असें तूं समज."

## कर्मफलाचा त्याग

कर्मांमध्यें निष्कामतेचें फल मिळवावयाचें झाल्यास कर्मफलाचा पूर्णपणें त्याग करावा हा तिसरा मार्ग. " बुद्धीच्या पाठीपोटीं व कर्मांच्या आदिअंतीं मला बांधणें तुला अशक्य असल्यास तूं संयमाचा अवलंब कर व कर्मांच्या फळांचा त्याग कर. वृक्षांस किंवा वेलींस मलतीं फळें आलीं, तर त्यांचा भार वाहणें असह्य होऊन तीं किंवा त्या जशी त्यांना खालीं टाकून देतात,' त्याप्रमाणें योग्य वेळीं कर्मांचीं फळें तूं टाकून दे. हीं कर्में ईश्वर–प्रातीसाठीं केलीं नाहींत तरी चालेल; तीं सर्व शून्यांत जाऊं देत. खडकावरील पावसाप्रमाणें, अग्नींत पेरलेल्या बीप्रमाणें किंवा झोंपेंत पाहिलेल्या स्वप्नाप्रमाणें तूं आपलीं सर्व कर्में निरर्थक समज. आपल्या मुलीविषयीं मनुष्य जसा निर्विकार असतो, त्याप्रमाणें सर्व कर्मांविषयीं तूं निष्काम राहा. आकाशांत अग्नीची ज्वाला विरून जाते, त्याप्रमाणें शून्यांत तुझीं सर्व कर्में नाहींशीं होऊं देत. हा फलत्याग, अर्जुना, साधारण वाटतो; परंतु खरोखर तो सर्व योगांत श्रेष्ठ आहे हें लक्षांत ठेव." परमेश्वरास कर्मफळें अर्पण करण्याची एखाद्याची स्वभावतः प्रवृत्ति नसली तर तीं शून्यांत विरूं द्यावी असें मत श्रीज्ञानेश्वरांनीं येथें प्रतिपादिलें आहे असें दिसतें.

## कर्मांचें ईश्वरार्पण

कर्मांतून नैष्कर्म्य प्राप्त करून घेण्याचा सर्वांत श्रेष्ठ मार्ग म्हणजे सर्व कर्में ईश्वरास अर्पण करणें हा होय. नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त करून देण्यास शून्य किंवा अभाव अगदीं अपुरी ठरतात. म्हणून भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें कर्में ईश्वरास अर्पण करावीं म्हणजेच निष्काम कर्म केल्याचें श्रेय मिळतें असें श्रीज्ञानेश्वरांनींहि प्रतिपादिलें आहे. " केलेलीं सर्व कर्में भक्तिभावानें मला अर्पण करावीं. तीं कर्में केल्याची आठवणसुद्धां मनांत ठेवूं नये. याप्रमाणें कर्में धुऊन माझ्या हातीं दे. अग्निकुंडांत बी टाकली म्हणजे तीस अंकुर फुटत नाहीं; त्याप्रमाणें चांगलीं व वाईट

दोन्हीं प्रकारचीं कर्में मला अर्पण केलीं म्हणजे त्यांस फळ येत नाहीं. कर्में माझ्या हवालीं करतांक्षणीं जन्म–मरण व त्यांचे क्लेश पुसून जातात. तेव्हां अर्जुना, उद्यांची वाट पाहूं नको. या नैष्कर्म्यसिद्धीचा ताबडतोब उपयोग कर." पुन्हां एके ठिकाणीं श्रीज्ञानेश्वर म्हणतात, "तूं इंद्रियें कोंडूं नको; भोग तोडूं नको; स्वधर्माचा अभिमान सोडूं नको. कुलधर्मांचें आचरण यथास्थित करावें व सर्व विधिनिषेध पाळावे. या सर्व गोष्टी करण्यास पूर्ण मोकळीक आहे. मात्र हे सर्व व्यवहार कायावाचामनें करीत असतां 'मी हें करीत आहे' ही भावना सोडून द्यावी. कांहीं करणें किंवा न करणें हें आपल्यावर अवलंबून नसून जो अखिल विश्व चालवितो त्या परमात्म्याकडे आहे. तुझी चित्तवृत्ति अखंड माझ्याठायीं ठेव. आपण सरळ चाललों आहों कां वांकडें याचा रथ कधीं विचार करतो काय? आणि जें जें करशील तें तें लहानथोर न म्हणतां शांतपणें मला अर्पण कर. ही सद्भावना अंगीं पूर्णपणें भिनली म्हणजे देह टाकल्यावर तूं माझ्यांत लीन होशील." शेवटीं, ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत आपल्या स्वकर्म–कुसुमांनीं विश्वात्मक देवाची पूजा करावी असें सांगितलें आहे. अशा पूजेनेंच परमात्म्यास अपार संतोष होतो व तो संतुष्ट झाला म्हणजे आपला प्रसाद म्हणून आपणांस वैराग्यसिद्धि देतो. या तीव्र वैराग्यानें व ईश्वराचा वेध लागल्यानें हें सर्व दृश्य जग वमनवत् त्याज्य वाटतें. आपल्या पतीच्या विरहानें पतिव्रतेला आपल्या जिवाचेंहि ओझें वाटतें, त्याप्रमाणें सर्व सुखें अशा मनुष्यास दुःखरूप होतात; जरी त्यास अंतिम तत्त्वाचें सम्यक्ज्ञान प्राप्त झालें नाहीं, तरी केवळ वेध लागल्यामुळें तो तन्मय होतो; म्हणून या योगाची एवढी महती आहे." याप्रमाणें कर्मांतूनच नैष्कर्म्य प्राप्त करून घेण्याचे चार मार्ग येथें सुचविले आहेत; सामाजिक जबाबदारी म्हणून कर्म करणें हा प्रथम मार्ग; आसक्ति न ठेवतां कर्में करणें हा दुसरा मार्ग; कर्मांच्या फळाचा त्याग करणें हा तिसरा मार्ग व सर्व कर्में ईश्वरास अर्पण करणें हा शेवटचा, चौथा, जास्त विधायक मार्ग होय.

## सत्त्व–रज–तमोगुणांपासून उद्भवणाऱ्या त्रिविध मनोवृत्ती

सात्त्विक, राजस व तामस या विविध मानसिक प्रवृत्तींच्या आधारें नैतिक मनोधर्मांचेहि सात्त्विक, राजस व तामस असे त्रिविध प्रकार मानतां येतात, हें मत आतां सर्वसामान्य झालें आहे. आतां सात्त्विक, राजस व तामस गुणधर्म मनुष्याच्या मनांत कसे उद्भवतात याचें सूक्ष्म पृथक्करणात्मक विवेचन श्रीज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायांत दिलें आहे. तेथें ते म्हणतातः—"सत्त्व, रज व तम हे गुण अनादि प्रकृतीच्या भूमिकेपासून निर्माण झाले आहेत. एकाच शरीरांत बाल्य, तारुण्य व वार्धक्य वसतात, त्याप्रमाणें एकाच वृत्तींत हे तीनहि गुण असतात. माशानें गळ गिळण्यापूर्वींच कोळी आपलें जाळें ओढतो, त्याप्रमाणें सत्त्वगुणरूपी पारधी सत्त्वगुण-प्रधान मनोवृत्तींच्या लोकांवर 'सुख व ज्ञान'–रूपी आपलें जाळें टाकतो व हरणांस

जाळ्यांत पकडावें त्याप्रमाणें त्यांना पकडतो. तेव्हां हे लोक ज्ञानानें शेफारतात, जाणिवेनें चौफेर उड्या मारतात व हातचें आत्मसुख घालवितात. विद्येनें व मानानें हे लोक खुष होतात, अल्पलाभानेंहि संतुष्ट होतात व आपणांस आनंद झाल्याच्या जाणिवेनें आपलीच बेफाम स्तुति करूं लागतात; 'माझें भाग्य फार आहे, माझ्याइतका सुखी जगांत कोणीच नाहीं' असें ते बडबडूं लागतात व सात्विक गुणांपासून उद्भवणाऱ्या सर्व आठ भावनांनीं त्यांचें अंतःकरण भरून जातें! एवढ्यावरच ते थांबत नाहींत. त्यांच्या अंगांत विद्वत्तेचें भूत शिरतें व आपण ज्ञानरूप आहोंत हें विसरून विषय-ज्ञानाच्या अभिमानानें आपण आकाशापेक्षांहि मोठे आहों असें त्यांना वाटूं लागतें." राजस मनोवृत्तीचा मनुष्य सदा सुखाच्या शोधांत गुंतलेला असतो व त्याची वासना नेहमीं तरुण असते. अग्नीवर तूप ओतलें तर तो आवाक्याबाहेर जातो, त्याप्रमाणें अशा मनुष्याच्या वासनांना सीमाच राहत नाहीं व त्याला सुवर्णमय मेरुपर्वत मिळाला तरी त्याची हांव वाढतच राहते. आज आपल्याजवळ आहे तें सर्व खर्चून गेलें तर उद्यां काय करावयाचें, या विचारानें तो निरनिराळे व्यवसाय करतो. 'स्वर्गांत गेल्यावर तेथें काय खावयाचें?' या विचारानें तो यज्ञ करूं लागतो. ग्रीष्मांतील वाऱ्यास विसावा नसतो, त्याप्रमाणें याच्या व्यापारास विश्रांति नसते. धांवणाऱ्या वाऱ्याप्रमाणें, कामिनीच्या कटाक्षा-प्रमाणें किंवा विजेप्रमाणें तो चंचल असतो. तितक्याच वेगानें तो कर्मांच्या आगींत शिरतो." "तामसी वृत्तीच्या मनुष्याचें वर्तन या दोहोंपेक्षां निराळें असतें. तो केवळ गाढ अज्ञानांत राहतो व हें अज्ञान म्हणजे अविवेकाचा महामंत्र, मूर्खपणाच्या दारूचें पात्र व सर्व विश्वास भुलविणारें अस्त्र आहे. तामस गुण म्हणजे सर्व इंद्रियांचा आळस व मनाचा मूर्खपणा होय. या आळसानें मूर्खपणा वाढतो. असा मनुष्य अंग मोडण्यांत व जांभया देण्यांत आपला सर्व वेळ घालवितो व त्यास कोणतेंहि काम करूं नये असें वाटतें. डोळे उघडे असून तो पाहात नाहीं, हांक न मारतांच झोपेंतून "ओ" म्हणून उठतो व एकदां दगडासारखा पडला कीं आकाश वर कोसळो कीं पृथ्वी रसातळास जावो, उठणें हा भावच त्याच्या मनांत उद्भवत नाहीं! चांगलें-वाईट त्यास कळत नाहीं. आहे तेथें लोळण्यासाठीं जणुं देवाने त्यास बुद्धि दिलेली असते. त्याला निद्रेविषयीं इतकी भयंकर आवड व इच्छा असते कीं, झोपी गेला म्हणजे तो स्वर्गहि तुच्छ लेखतो. 'मला ब्रह्मदेवाचें दीर्घ आयुष्य मिळूं दे, पण तें सर्व मला निजूनच घालवूं दे' असें तो म्हणतो. रस्त्यांत चालत असतां तो डुलक्या घेतो व झोंपतो! त्यास अमृताचीहि इच्छा नसते. कोणाशीं कसें वागावें व काय बोलावें हें त्यास कळत नाहीं. आपल्या चिमुकल्या पंखानें माशीनें वडवाग्नि विझवूं पाहावें, त्याप्रमाणें तो निष्कारण धाडसाचीं कर्में करतो; न करून दाखवितां येणाऱ्या कामाविषयीं धैर्य दाखवितो व चुकाबद्दलहि धन्यता मानतो. सारांश, निद्रा, आलस्य व प्रमाद या तीन दोरखंडांनीं तामसी मनुष्य जखडलेला असतो."

## गुणत्रयाचा त्याग

त्रिगुणांचें साम्राज्य मनावर आहे त्यांचे साधारण स्वभावधर्म येथवर सांगितले. या गुणांच्या पलीकडे हजारांतून एखादाच जातो. त्यांच्या बंधनांतून सुटणें, आत्मरूपाशीं एक होणें व याप्रमाणें त्रिगुणातीत होणें म्हणजेच खरी मुक्ति होय. निरनिराळ्या सोंगांनीं नट जसा फसत नाहीं, त्याप्रमाणें मनुष्यानें गुणांच्या सामर्थ्यानें फसूं नये. वनांतील वनलक्ष्मीच्या विलासाचें कारण वसंत असतो, त्याप्रमाणें या गुणांच्या विस्ताराचें कारण ईश्वर आहे. तारांगणें केव्हां मावळतात, सूर्यकांत केव्हां उद्दीप्त होतो, कमळ कसें उमलतें व अंधार कसा नाहींसा होतो, हें जसें सूर्यास दिसत नाहीं, त्याप्रमाणें मी अकर्ता असून सत्तारूपानें या देहांत राहतों, हा बोध किंवा विवेक ज्याच्या अंतःकरणांत उत्पन्न होतो, तोच या त्रिगुणांपलीकडे जाऊन नदी शेवटीं समुद्रास मिळते त्याप्रमाणें शेवटीं मला येऊन मिळतो. पिंजऱ्यांतील पोपट ज्याप्रमाणें लोखंडी नळिकेवरून उडून स्वतंत्रपणें झाडांच्या फांद्यावर बसतो, त्याप्रमाणें तो गुणांवरून उडून स्वतंत्रपणें मूळ आत्मरूपावर येतो. जो अज्ञान—निद्रेंत झोंपून डाराडूर घोरत होता, तो पूर्ण जागृत स्वरूपांत जागा होतो. बुद्धिभेदाचा आरसा त्याच्या हातांतून गळून पडतो व त्यास आपलें प्रतिबिंब प्रकृतींत दिसेनासें होतें. देहाभिमानाचा वाहता वारा थांबला व ‘ जीव आणि ईश’रूपी लहरी व सागर यांचें ऐक्य झालें ! कांचेच्या घरांत पेटविलेल्या दिव्याचा प्रकाश जसा बाहेर कधींच फांकल्याशिवाय राहात नाहीं किंवा वडवानळ जसा समुद्राच्या पाण्यानें विझत नाहीं, त्याचप्रमाणें त्याचें आत्मज्ञान आल्यागेल्या गुणांनीं मळत नाहीं. तो पाण्यांत न भिजणाऱ्या चंद्रबिंबाप्रमाणें असतो. हे तीनहि गुण आपल्या सामर्थ्यानें देहास बाहुलाप्रमाणें नाचवीत असले तरी तो त्यांत मिसळत नाहीं. आपल्या शरीरांत काय चाललें आहे हें देखील तो जाणत नाहीं. कांत टाकून साप पाताळांत गेल्यावर, त्या कातडीच्या खोळीची फिकीर कोण करील ? फुलापासून निघालेला सुवास एकदां आकाशांत विरून गेला म्हणजे तो पुनः फुलाकडे परत येतो काय ? त्याप्रमाणें तो एकदां स्वरूपांत समरस होऊन गेल्यावर या देहधर्मांचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नाहीं.

## अश्वत्थ—वृक्षाचें ( भव—वृक्षाचें ) उन्मूलन

याप्रमाणें गुणांच्या गुलामगिरींतून मनुष्यास मुक्त होतां येतें. मागें विस्तारानें वर्णन केलेल्या असत्यरूपी अश्वत्थवृक्षाचें उन्मूलन सदाचरणानें कसें करतां येतें याविषयीं सूक्ष्म विवेचन श्रीज्ञानेश्वरांनीं दुसऱ्या एका रूपक—मालेच्या सहाय्यानें केलें आहे: ‘ या वृक्षाचीं पाळेंमुळें खणून काढावयास निघालेल्या मनुष्याचें मन वैराग्यपूर्ण बनतें. कुत्रा आपल्या वमनाकडे फिरून पाहत नाहीं त्याप्रमाणें

या वैराग्यामुळें तो त्रिगुणांचा त्याग करतो. देहाहंकाराच्या म्यानांतून विवेक-खड्ग उपसून तो तें प्रत्यग्बुद्धिरूपी हातांत सहज धरून, विवेकरूपी दगडावर पाजळतो तेव्हां त्या खड्गास 'अहं ब्रह्मास्मि' या ऐक्याची तीक्ष्ण धार येते; त्यास पूर्ण बोधानें स्वच्छ घांसून व निश्चयाचें मुष्टिबळ एक-दोन वेळां पाहून तें शुद्ध अंतःकरणाच्या मननानें पेलावें. मग निदिध्यासानें विवेकखण्ड व आपण एक झाल्यावर व घाव घालण्यास समोर कांहींच विषय राहात नाहीं! या आत्मज्ञानाच्या तलावारीपुढें व अद्वैतबोधाच्या निवाड्यापुढें भव–वृक्ष केव्हांच नाहींसा होतो! मग त्या वृक्षाचीं मुळें स्वर्गाकडे जातात का नरकाकडे, त्याच्या शाखा खालीं वाढतात का वर, हा विचारच उरत नाहीं. चांदण्यांत मृगजळ नाहींसें होतें, त्याप्रमाणें तो वृक्ष आपोआपच नाहींसा होतो."

त्रिगुणांची गुलामगिरी झुगारून देणें किंवा भववृक्षाचें उन्मूलन करणें हाच ईश्वर–प्राप्तीचा मार्ग होय हें आपण पाहिलें. त्याचप्रमाणें काम, क्रोध, व लोभ हे परमार्थ मार्गावरील मारेकरी असून त्यांचा नाश केल्याशिवाय परमेश्वरप्राप्ति होत नाहीं असें गीतेप्रमाणें ज्ञानेश्वरींतहि सांगितलें आहे. "हे तिघे जेथें जमतात, तेथें अशुभ पिकतें असे समजावें. सर्व दुःखांचें स्थान गांठणाऱ्यांचे हे वाटाड्ये आहेत. नरकवास भोगावयास लावणाऱ्या पातकांचें हें संमेलनच आहे. पुराणांतरीं वर्णिलेल्या रौरव नांवाच्या नरकाचा विचार करा कशाला? हे मूर्तिमंत रौरव नरक आहेत! नरकाची वाट दाखविणारी त्या नरकाच्या उंबरठ्यावर रोवलेली ही त्रिफळी आहे! यांच्यामध्यें जो उभा राहतो, त्यास नरकांत मोठा मान मिळतो. हे तीनहि जोंपर्यंत जिवंत व जागृत आहेत, तोंपर्यंत खऱ्या कल्याणाची भाषाच नको! ज्याला आपला नाश होऊं नये व आपलें हित व्हावें असें वाटतें, त्यानें ह्यांच्यापासून सावध राहावें व यांच्या वाटेस जाऊं नये. पाठीं भला मोठा दगड बांधून कोणी जिवंतपणीं समुद्र तरून गेला आहे काय? किंवा काळकूट विष खाऊन कोणी जगला आहे काय? हे तीन ज्यांच्या मनापासून दूर राहिले, त्यांनाच सत्संग लाभतो व मोक्षाचा मार्ग मिळतो. मग सत्संगाच्या जोरावर व सत्शास्त्राच्या सामर्थ्यानें ते जन्म–मरणांचें निबिड अरण्य ओलांडून जातात व गुरुकृपेच्या परमानंदपूर्ण शहरीं पोहोंचतात. तेथें संसाराचा सर्व गलबला नाहींसा होऊन त्यांना पूर्ण आत्मानंद प्राप्त होतो."

# राष्ट्रीय उत्कर्ष साधूं या

***************************

राष्ट्रीय उत्कर्षाचा पाया ही शब्दत्रयी फार मोहक आहे. ह्या त्रयींतला पहिला शब्द जणुं काय जादूनें भारलेला आहे. राष्ट्र ह्या शब्द उच्चारतांच मनांतल्या सर्व क्षुद्र भावना नाहींशा होतात. आपलपोटेपणा, मत्सर, हेवा इत्यादि सर्व दूर पळून जातात. ह्या शब्दाच्या मननानें आपण अहंता व ममता ह्यांचें जाळें तोडून टाकून, कोंदट हवेंतून निघून उघड्या व औदार्यानें युक्त अशा वातावरणांत वावरूं लागतों. ह्याच शब्दाचा एकसारखा विचार केल्यामुळें, त्याचा निदिध्यास लावून घेतल्यामुळें आपल्याला राष्ट्राभिमानी पुरुषांची परंपरा लाभली आहे. राष्ट्रीय उत्कर्ष कशानें होईल, ह्याविषयीं विचार सुचूं लागले म्हणजे आपणामध्यें सद्‌गुणांची वाढ होऊं लागते व स्वार्थत्यागाची आपल्याला खरी योग्यता समजूं लागते. इतक्या ह्या महत्त्वाच्या विषयाचा विचार करणें अत्यंत लाभदायक होईल ह्यांत तिळप्रायहि संशय नाहीं. परंतु वीस-पंचवीस मिनिटांचे अवधींत ह्याचा सर्वांगीं विचार होणें शक्य नाहीं; म्हणून राष्ट्रीय उन्नतीचा पाया मुख्यतः कशावर अवलंबून आहे, त्या तीनचार गोष्टींचाच येथें उल्लेख करावयाचा आहे.

ही राष्ट्रीयत्वाची कल्पना निदान हिंदुस्थान देशामध्यें अगदीं अलिकडची आहे. पूर्वी ह्या देशामध्यें एकाच कालीं राजे राज्य करीत असल्यामुळें, प्रांतिक भावना उत्पन्न होणें शक्य नव्हतें. अकबराच्या वेळीं देखील ह्या भावनेचा व्हावा तसा विकास झाला नाहीं. राष्ट्राविषयींची योग्य कल्पना मनांत बाणण्याला मुख्यतः राष्ट्राचा शास्ता एकच असला पाहिजे व प्रजेमध्यें बंधुभाव वसत असला पाहिजे.

राष्ट्रीय उन्नतीच्या पायाची शिक्षण ही कोनशीला आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय आमचें खरें हित कशांत आहे व तें साधण्यास काय उपाय योजावे हें साधारण जनसमूहाला समजणार नाहीं; व जोंपर्यंत साधारण जनसमूह-स्त्री व पुरुष-अज्ञान स्थितींत आहे, तोंपर्यंत त्याला राष्ट्र म्हणजे काय ह्याची कल्पना होणार नाहीं; मग त्याचा उत्कर्ष करण्याचें लांबच राहिलें. शिक्षणाच्या अभावीं आमचें किती नुकसान होत आहे ह्याची आपणाला योग्य कल्पना आहे काय? शिक्षण नसल्यामुळें एकंदर मानवी जीवनाचा केवढा मोठा ऱ्हास होतो आहे! बालपणींच मुलें किती मृत्युमुखीं पडत आहेत. वाईट चालीरीतींमुळें मुलांमुलींची वाढ कशी खुंटली आहे व दुष्ट रूढीच्या प्राबल्यामुळें एकंदर जनसमूहाचा जोम कसा नाहींसा होतो आहे, ह्याचा कोणी कळकळीनें विचार केला आहे काय? राष्ट्रीयत्वाची नुसती कल्पना उदित होऊन

काय कामाची? ती जोमानें वाढण्याला व तिला मूर्तस्वरूप देण्याला जो स्वार्थत्याग पाहिजे तो करण्याचें सामर्थ्य येण्याला त्याला ज्ञानाचा पाठिंबा मिळाला पाहिजे. पण आपली शिक्षणविषयक स्थिति पाहिली तर ती फार निराशाजनक आहे. बहुतेक लोक अक्षरशत्रु आहेत, ते साक्षर झाले पाहिजेत. प्राथमिक शिक्षण पूर्वीपेक्षां आकुंचित होत आहे; दुय्यमप्रतीच्या शिक्षणाच्या मार्गांत शिक्षणखातें बऱ्याचशा अडचणी पसरवीत आहे, उच्च शिक्षणाला शिक्षणसंस्थांचा असावा तसा पुरवठा नाहीं. मातृभाषेतून नुसत्या चार इयत्ता शिकविल्या म्हणजे झालें शिक्षण, असें आपण समजतां नये. शिक्षणाच्या योगानें विचारजागृति झाली पाहिजे. इतकें शिक्षण स्त्री व पुरुष ह्या दोघांनाहि सारख्या प्रमाणांत मिळालें पाहिजे.

राष्ट्रीय उत्कर्ष होण्याला दुसरी महत्त्वाची जरूरीची गोष्ट म्हणजे समाजामध्यें स्त्रियांचा दर्जा वाढविणें ही होय. स्त्रिया म्हणजे शूद्रांच्या तोडीच्या, त्यांना शिक्षणाची आवश्यकता नाहीं, त्यांचा दर्जा पुरुषांपेक्षां कमी अशी त्यांच्याविषयीं अनुदारतेची भावना जोंपर्यंत पुरुषांच्या ठिकाणीं कायम राहील तोंपर्यंत राष्ट्राची उन्नति होणार नाहीं. स्त्री म्हणजे राष्ट्रमाता आहे, हें आपण विसरतां कामा नये. स्त्रियांनीं उत्तम पत्नी व्हावें, त्यांनीं उत्तम आया व्हावें, त्यांना छानदार स्वयंपाक करतां यावा ह्या राष्ट्रासंबंधानें स्त्रियांविषयींच्या उच्च कल्पना नव्हत. आपल्या देशांत अद्यापिहि सुशिक्षितांमध्यें स्त्रीशिक्षणासंबंधीं जितकी उदारता असली पाहिजे तितकी नाहीं, हें दुःखानें कबूल करावें लागतें. साधारणपणें हिंदु स्त्रिया चांगल्या माता असतातच; त्यांना स्वयंपाकहि चांगला करतां येतो. म्हणून केवळ ह्याच धोरणाचें शिक्षण नको आहे. पुरुषांना ज्या श्रेष्ठ हेतूनें शिक्षण दिलें जातें किंवा जावें, त्याच हेतूनें व तितकें शिक्षण स्त्रियांनाहि दिलें पाहिजे. स्त्रियांचा मालमत्तेवर वारसा नाहीं. दुसऱ्याहि अनेक बाबींत स्त्रियांचा सामाजिक दर्जा कमी आहे. तरुणांमध्यें, विशेषतः शाळेंतील विद्यार्थ्यांमध्यें, स्त्रियांविषयीं आदरभाव नसतो; स्त्रीशिक्षणासंबंधानें शाळांत व कॉलेजांमध्यें होणाऱ्या वादविवादांमध्यें शिळे व मनाची क्षुद्रता व्यक्त करणारे मुद्दे नेहमीं पुढें करण्यांत येतात. ही स्थिति नाहींशी झाली पाहिजे. स्त्रिया व पुरुष मिळून जर संसाराचे गाडे तयार होतात, तर त्या गाड्यांच्या सर्व चाकांची वाढ सारखी होणें अवश्य नाहीं काय? "यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः" असें तोंडानें नुसतें म्हणण्यांत व आमच्या पूर्वजांच्या वेळीं स्त्रियांचा दर्जा मोठा होता अशी बढाई मारण्यांत काय अर्थ आहे! प्रत्यक्ष कृतीनें आपण स्त्रियांना समतेनें वागवितों असें जेव्हां करून दाखवूं तेव्हांच समाजाची स्थिति सुधारेल व राष्ट्रीय जीवनाचा पाया भक्कम घातल्यासारखें होईल.

राष्ट्राच्या उत्कर्षासंबंधीं तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे **जातिभेद**


**नाहींसा होणें** ही होय. ह्या अमानुष जातिभेदामुळें एकंदर राष्ट्र छिन्नविछिन्न झालें आहे. राष्ट्रीय गात्रें विगलित झालीं आहेत; राष्ट्राचा जोम नाहींसा झालेला आहे. एकाच मायभूमीचीं सर्वजण बालकें असून तीं परस्परांचे शत्रु होऊन बसलीं आहेत. जातिभेद कोणत्याहि कारणानें अस्तित्वांत आलेला असो त्याची आज जरुरी नाहीं. तो नाशकारक आहे. देशाच्या प्रगतीच्या तो आड येतो आहे. मि. मॅंटेग्यु-साहेब आपल्या सुधारणासंबंधाच्या रिपोर्टांत त्याचा प्रामुख्यानें उल्लेख करून त्याच्याच-मुळें सुधारणा अधिक उदारतेनें करतां येत नाहींत असें म्हणत आहेत. पदोपदीं त्याचा कडू अनुभव आपल्याला येत असून तो मोडण्यासाठीं अधिक जोराचे प्रयत्न करण्यांत येऊं नयेत ही अत्यंत खेदाची गोष्ट होय! हल्लींचा काळ उच्चनीचत्वाच्या खुळ्या कल्पना बाजूस सारून खांदा लावून काम करण्याचा आहे. आपण सर्व कृत्रिम भेद-भाव विसरले पाहिजेत व बंधुत्वाच्या भावनेनें प्रेरित होऊन राष्ट्राचें बल वाढविलें पाहिजे. विराट पुरुषाचे पाय म्हणजे शूद्र व तोंड म्हणजे ब्राह्मण ही कल्पना कितीहि मोहक वाटली तरी, तीमुळें जर उच्चनीचत्वाची भावना वृद्धिंगत होत असेल व राष्ट्र-हिताच्या जर ती आड येत असेल तर ती सर्वांनीं दूर फेंकून देण्यास तयार व्हावयास नको काय? आतांपर्यंत सांगितलेल्या तीन मुख्य गोष्टी झाल्या असतां राष्ट्राची प्रगति झपाट्यानें होईल असा माझा समज व दृढ विश्वास आहे. पण ह्या तीनहि गोष्टी पूर्णपणें साध्य होणें चवथ्या एका गोष्टीवर अवलंबून आहे. आपल्या किंवा आपल्या देशाच्या सोयी सुखाकरितां किंवा उत्कर्षासाठीं कांहीं विवक्षित तत्त्वें ग्रहण करून त्यांप्रमाणें वागणें हें रास्तच आहे, परंतु तीं तत्त्वें न्याय म्हणून अनुसरणें हें अधिक श्रेयस्कर व फलदायक आहे. देशाच्या हितासाठीं जातिभेद मोडण्यास तयार होणें, राष्ट्राच्या उन्नतीकरितां स्त्रियांचा दर्जा वाढविणें, किंवा शिक्षणाचा प्रसार करणें ह्यापेक्षां ह्या गोष्टी योग्य, न्याय्य, समतेच्या तत्त्वाला उचित, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे **धर्माला धरून, म्हणून करणें** हें अधिक श्रेष्ठत्वाचें द्योतक आहे. जो धर्म सर्वांना शिक्षणाची मुभा आहे असें प्रतिपादितो, जो "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" ह्या उक्तीचा उघड उघड निषेध करतो, जो परमेश्वर हा सर्वांचा पिता आहे व म्हणून सर्व मनुष्यजात भ्रातृत्वाच्या नात्यानें बद्ध झाली आहे असें कंठरवानें सांगतो व कृतीनें सर्वांच्या नजरेस आणीत आहे, त्या धर्माला अनुसरून म्हणजे शाश्वत अशा तत्त्वांचा आसरा करून वर्तन करणें हें केवळ वर वर दिसणाऱ्या नफ्याचा विचार करून वागण्यापेक्षां सहस्रपटीनें चांगलें नाहीं काय? आमच्या देशाची आजकाल मुख्यतः हीच मोठी उणीव आहे, ती भरून निघाली पाहिजे. आपल्या देशामध्यें युक्तीला व विवेकाला पटणाऱ्या धर्माचा प्रसार व्हावयाला पाहिजे आहे. आम्हांला तत्त्वज्ञानाचें अवडंबर नको; भलत्यासलत्या रुढींनीं व बाह्य आचरणांनीं

बांधून टाकणारा धर्म नको; साधारण जनसमूहाला, साळ्यामोळ्यांना सुद्धां सहज रीतीनें पटणारा असा उदारतेनें, प्रेमानें, भूतदयेनें भरलेला धर्म पाहिजे. राष्ट्रीय उत्कर्षाचा पाया मजबूत व्हावा, त्यांतील सर्व दगड, रेती, चुना इत्यादि एकमेकांना धरून रहावीं, सर्वांची शक्ति वाढावी म्हणून ह्या धर्मरूपी सिमेंटाची फारच मोठी आवश्यकता आहे. परमेश्वराच्या कृपेनें धर्माची लोकांना थोडीबहुत आवश्यकता भासूं लागली आहे व गोडीहि लागूं लागली आहे. ती अधिकाधिक लागो अशी परमेशापाशीं प्रार्थना आहे.




## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, कामाठी मोहल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. सासरकर

# चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं !

**एकनाथस्वामी हे स्वभावतः चमत्कार करून दाखविण्याविरुद्ध होते. परंतु प्राप्त परिस्थितीनुरूप कित्येक प्रसंगीं त्यांना चमत्काराच्या आहारीं जावें लागलें. कधीं कधीं निरुपाय म्हणून तो मार्ग आक्रमणें साधुसंतांना भाग पडत असतें. अशा कांहीं चमत्कारांची माहिती पुढें करून देण्यांत आली आहे:—**

## चमत्कार पहिला

भूतदया—एकनाथाचे घरीं पितृतिथि असल्यामुळें, आदले दिवशीं एकनाथानें पैठणांतील कांही ब्राह्मणांस क्षण दिला होता. पितृतिथीचे दिवशीं दहा वाजण्याचे सुमारास पाक सिद्ध झाला असतां, द्विजवर्यांची वाट पहात एकनाथ दारांत उभा राहिला.

एकनाथाचे घरावरून त्या सुमारास कांहीं क्षुधापीडित अंत्यज चालले होते; त्यांनीं तो श्राद्धीय अन्नाचा खमंग वास अनुभवतांच त्यांची क्षुधा द्विगुणित झाली. मग ते नाथाच्या घरापासून बरेच अंतरावर गेल्यावर कोणास ऐकूं न जाईल अशा रीतीनें परस्परांत बोलतात. "कायहो हा अन्नाचा सुवास! असें सुग्रास अन्न आम्हांस कधीं तरी मिळण्याचा संभव आहे काय?" दुसरा त्यास उत्तर देतो, "छीः, महारांस असले खमंग पदार्थ कोठून खावयास मिळणार?" हा त्यांचा संवाद एकनाथाच्या कानीं ओझरता पडला. नाथाचें अंतःकरण भूतदयेनें द्रवीभूत होऊन त्यानें मोठ्या उल्हासानें व आनंदानें त्या अत्यजांस हाक मारिली. नंतर ते नको नको म्हणत असतांही आग्रह करून एकनाथानें तो अंत्यजसमूह श्राद्धीय अन्नरसमाधुरीनें तृप्त करून सोडिला; व मोठ्या आदरानें त्यांस मार्गस्थ केलें. नंतर सडासंमार्जन करून पुनश्च पाकसिद्धि केली व ब्राह्मणांस बोलावण्याकरितां उद्धवास सांगितलें.

इकडे क्षण घेतलेल्या ब्राह्मणांस हा सर्व प्रकार विदित होताच. त्यामुळें, त्यांनीं उद्धवास साफ सांगितलें कीं, "वर्णसंकर करणाऱ्या नीतिभ्रष्ट अधमाधमाच्या घरी आम्हीं येत नाहीं. एकनाथ बहिष्कृत असून हें ग्रामण्याचें प्रकरण मोठेंच माजणार." असा हा ब्राह्मणांचा निरोप उद्धवानें परत येऊन आपल्या गुरूला विदित केला.

एकनाथानें तें सर्व शांतपणें ऐकून घेतलें. त्याचे मन यत्किंचित्‌सुद्धां खट्टू न होतां, परत मध्यगृहांत येतो तों ब्राह्मणाकरितां मांडलेल्या पाटांपैकीं, एकहि पाट रिकामा न रहातां, स्वच्छ वस्त्रें परिधान केलेले भस्मचर्चित, शुद्ध आणि पवित्र द्विजवर्य, दर्भपुंज घेऊन आसनारूढ झाले आहेत!!!

नंतर यथाविधि श्राद्धसंकल्प करून सर्व गोष्टी यथासांग झाल्या. गिरजाबाई-सारखी दक्ष बायको घरांत असल्यामुळें एकनाथाचा भोजनसमारंभ काय विचारावा! ब्राह्मणांचा यथेच्छ भोजनसमारंभ काय विचारावा! ब्राह्मणांचा यथेच्छ भोजनविधि झाल्यावर पिंडदानादि कृत्यें उरकून यजमानास विचारून हा विप्रसमूह बाहेर पडला.

इकडे क्षण दिलेले ब्राह्मण एकत्र जमून एकनाथास फजित करावें व त्यास बहिष्कृत करावें या उद्देशानें लगबगीनें मोठमोठ्यानें गडबड करीत, व मिशांवर ताव देत एकनाथाच्या घराकडे आले; आणि पाहतात तों केशरी गंध लावलेले द्विजवर्य, हातांत गंगाजमुनी झाऱ्या घेऊन, तांबूलचर्वण करीत व ढेकरा देत एकनाथाच्या घरांतून बाहेर पडत आहेत!! व त्या विप्रांच्या झुंडींतच, या क्षण घेतलेल्या पैठणकर ग्रामण्यपंडितांपैकीं, कोणाचे परलोकवासी आजे, कोणाचे वडील, कोणाचे पितृव्य, कोणाचे प्रपितामह, कोणाचे मृतबांधव अशी मंडळी दृष्टिगोचर झाली!!! हा अद्‌भुत चमत्कार पाहून कसले ग्रामण्य! आणि कसला बहिष्कार! ती पैठणकर मंडळी खजील होऊन एकनाथास शरण आली व नाथ हा कोणी असामान्य पुरुष असावा, अशी त्यांची खात्री झाली!!

## चमत्कार दुसरा

जातिभेद—पैठणामध्यें एक सदाचारसंपन्न, नैष्ठिक, भक्तिमान् आणि ज्ञानी महार रहात असे. त्याचें नांव रामा असें होतें. रामाची बायकोही त्याप्रमाणेंच सुशील असून भाविक होती. तीं उभयतां एकनाथाच्या पुराणास, कीर्तनास व भजनास नित्यनेमानें व भक्तीनें जात. एकनाथाच्या ठिकाणीं त्यांची पूर्ण श्रद्धा असून यथाशक्ति त्याची ती सेवाचाकरी करीत.

" जनार्दनाशिवाय पदार्थच नाहीं " हें एकनाथाचें मत त्यांचे ठिकाणीं ठसून गेलें होते. या कारणानें एक वेळ आपल्या घरीं भोजनास यावें, अशी जी फार दिवसांची इच्छा रामाच्या व त्याच्या बायकोच्या अंतःकरणांत होती, ती इच्छा तृप्त करण्यास ' जनीं जनार्दन ' हें महावाक्य प्रतिबद्धक होणार नाही, असें जाणून रामानें नाथाला भोजनास बोलाविलें. रामाचा भाव, त्याची श्रद्धा, त्याचें आचरण ही एकनाथाला पूर्णपणे ठाऊक असल्यामुळें, त्यानें ती गोष्ट मान्य केली.

नंतर नेमलेल्या दिवशीं एकनाथ रामाचे घरीं गेला. त्या ठिकाणीं यथाशक्ति

रामानें जी भोजनसिद्धता केली होती तिचा मोठ्या संतोषानें नाथानें स्वीकार केला. एकनाथ राम्या महाराकडे जेवावयास गेला, ही वार्ता केवळ बाह्य पावित्र्यावरच खुलणारे व शालजोडी खांद्यावर उडविणारे टिळाटोपीवाले मत्सरी शास्त्रीपंडितांस कळतांच नाथाची धिंड काढावी या हेतूनें त्याला पकडण्याकरितां कांही मंडळी चोरून त्याच्या मागोमाग महारवाड्याकडे गेली, व कांहीं मंडळी तो परत पळून न यावा म्हणून एकनाथाच्या घराकडे गेली.

राम्या महाराचे घरीं जाऊन पहातात तों, एकनाथ मोठ्या प्रेमानें आमटी भुरकीत बसला आहे! मग त्याला, जेवीत असतां धरावा ह्या हेतूनें कांहीं मंडळी आंत शिरणार, इतक्यांत नाथाच्या घराकडे गेलेली मंडळी येऊन सांगूं लागली कीं, "व्यर्थ कां कष्ट करितां? एकनाथ स्वगृहीं झोंपाळ्यावर बसून उद्धवाबरोबर खुशाल गोष्टी सांगत आहे!!" तेव्हां एकच एकनाथ दोन ठिकाणीं कोठून आला, म्हणून खात्री करण्याकरितां एकनाथाचे घरीं जाऊन पहातात तों, खरोखरीच तोच एकनाथ एकसमयावच्छेदेंकरून भिन्न स्थलीं भिन्न व्यापार करीत आहे!!! व कांहीं वेळानें अवलोकन करतात तों, रामाचे घरींच येथेच्छ भोजन झाल्यावर तांबूल घेऊन एकनाथ जागच्याजागींच अदृश्य झाला!!!

### चमत्कार तिसरा

गंगेचा पाट—एकनाथाच्या अलौकिक पुराणश्रवणाकरितां, त्याचे घरीं तिसरे प्रहरीं श्रोतृजनांची मोठी गर्दी जमे. तें पुराण ऐकण्याकरितां एक अत्यंत लावण्ययुवती येत असे. त्या तरुण स्त्रीचें अलौकिक रूपसौंदर्य, तिचें पांढरें शुभ्र पातळ, काळा कुळकुळीत केशकलाप व दैदीप्यमान अलंकारशोभा हीं सर्व अवलोकन करून कित्येक कामी पुरुषांची चित्तवृत्ति चंचल होई. परंतु त्या स्त्रीची शांत मुद्रा, पवित्र आचरण व भारदस्त स्वभाव पाहून ते जागच्याजागींच थिजून जात!

तथापि एके दिवशीं दोन मदांध पुरुषांच्या मनांत ह्या स्त्रीवर झडप घालावी असा विचार येऊन, त्या दिवशीं सायंकाळीं पुराण आटोपल्यावर हे दोघे त्या स्त्रीच्या मार्गे लांडग्याप्रमाणें पाठलाग करीत चालले. ती स्त्री मागें न पाहातां खालीं पहात शांततेनें गोदातीरापर्यंत गेली. ह्या कामपीडित पतंगांस वाटलें कीं, आतां ही आत्महत्या कदाचित् करील, व त्यामुळें हातूची शिकार नाहींशी होईल, म्हणून ते ह्या पवित्र ज्योतीवर झडप घालणार इतक्यांत गोदानदी दुभांग झाली, व त्यांत ही तरुण स्त्री क्रोधयुक्त मुद्रेनें त्या शठद्वयाकडे अवलोकन करीत अंतर्धान पावली!!!

नंतर ही वार्ता दुसरे दिवशीं एकनाथास कळून, त्यानें त्या दोघां पुरुषांस

उपदेश केला व ती प्रत्यक्ष भागीरथी स्त्रीरूप धरून पुराणश्रवणास येई असें सांगितलें! पैठणामध्यें अजूनही चाल आहे कीं, कोठेंही पुराण व्हावयाचें असलें, तर पुराणिकाजवळच 'गंगेचा पाट' म्हणून एक पाट मांडितात! व हळदकुंकवाच्या वाट्या ठेवितात!! ही चाल तेव्हांपासून पडली!!

## चमत्कार चौथा

हरिपंडित आणि पत्रावळी—एकनाथाचा एकुलता एक मुलगा हरिपंडित मूर्खपणानें बापावर रुसून काशींत जाऊन राहिला होता, त्यास समजावून एकनाथानें परत पैठणास आणिलें. परंतु त्यावेळेस बापलेकांचा असा करार मदार झाला होता कीं, बापानें प्राकृत पुराण सांगण्याचें बंद करावें, व परान्नग्रहण करूं नये ह्या करारावर पंडितांची स्वारी पैठणास परत आली.

हरिपंडित आल्यावर एकनाथानें वाड्यांतील पुराण बंद केलें व ह्या पंडितांनीं आपली गीर्वाणगिरा सुरू केली. परंतु चमत्कार हा कीं, ज्या वाड्यांत एकनाथाचे पुराणश्रवणास गर्दीमुळें जागाही मिळूं नये, त्याच ठिकाणीं ह्या संस्कृत पुराणाची सुरवात होण्याबरोबर, भोळ्याभाविक भक्तांपैकीं कोणीच ऐकावयास येईना! फक्त टिळाटोपी करणारे 'श्रोतव्यं, दातव्यं,' वर्गापैकीं कांहीं नियमित मंडळी कधीं कधीं येत व केव्हां केव्हां तर पंडितासच श्रोत्यांचीं आणि वक्त्यांचीं कामें बजावावीं लागत!!

असा प्रकार चालला असतां, एका सुशील, सदाचारी व भाविक वृद्ध स्त्रीनें एकनाथाला आपले घरीं मोठ्या आदरानें भोजनास बोलाविलें. हरिपंडिताबरोबर केलेल्या करारामुळें, एकनाथास रुकार देववेना. शेवटीं बापलेकांच्या विचारानें मोठ्या मिनतवारीनें असें ठरलें कीं, हरिपंडितानें आपल्या घरची सामुग्री नेऊन त्या भाविक स्त्रीच्या घरीं पाकनिष्पत्ति करावी व बापलेकांनीं तेथेंच अन्नग्रहण करावें, म्हणजे परान्नाची अडचण मोडून त्या वृद्ध स्त्रीचेंही मन मोडलेंसें होणार नाहीं.

संकेताप्रमाणें उभयतां त्या सुशील स्त्रीचे घरीं भोजन करीत असतां, त्या भाविक स्त्रीनें एकनाथासाठी मोठ्या प्रेमानें आणि काळजीनें खर्पूस पोळ्या भाजून ठेविल्या होत्या, त्या आणून भाविकपणानें दोघांच्या पानांत वाढिल्या! पोळ्या पानांत पडतांच 'अब्रह्मण्यं! अब्रह्मण्यं!' म्हणून मोठ्यानें ओरडत हरिपंडित पानावरून उठला! त्याच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचली.

पंडितानें, मग एकनाथाला व त्या बिचाऱ्या स्त्रीला शिव्या देत देत, दोघांच्या पुढील पत्रावळी उचलून बाहेर फेंकून दिल्या; व स्नान धुवून घरांत येतो तों, पुनः

पूर्ववत् जागच्याजागीं पत्रावळी आहेतच! हें पाहून पंडितांनीं पुनः पत्रावळी उचलल्या, आणि फेकून देऊन आंत येऊन पहातात तों पत्रावळी आहेतच!!

याप्रमाणें पंडितांनीं रागानें पत्रावळी काढाव्या व त्या पूर्ववत पुनः उत्पन्न व्हाव्या! असा प्रकार कांही तासपर्यंत चालल्यावर पंडिताची कंबर ठणकूं लागून ते अगदीं थकून गेले आणि आपला पिता साधारण पुरुष नव्हे, अशी त्याची खात्री झाली. एकनाथानें त्यास उपदेश करून त्याच्या मूर्खपणाबद्दल व गर्विष्ठपणाबद्दल त्याची चांगलीच कानउघाडणी केली. पंडित तेव्हांपासून पित्राज्ञा उल्लंघिनासे झाले!

## चमत्कार पांचवा

दुष्टांस सुष्ट करण्याची रीति—एके दिवशी एकनाथ निद्रिस्त असतां अकस्मात् चार चोर त्याचे घरीं शिरले. हातांत पेटविलेली दिवटी घेऊन ते चीजवस्त गोळा करीत आहेत, इतक्यांत चौघांचे डोळे अकस्मात् जाऊन चौघेहि अंधऋषि बनले!! मग घाबऱ्यां घाबऱ्यां जो तो पळून जाण्याविषयीं प्रयत्न करूं लागला; परंतु स्थल अपरिचित असल्यामुळें एकजण जिन्यांत पडून गडबडां खालीं आला! त्या आवाजासरसा एकनाथ जागा होऊन पहातो तों अंधऋषींची त्रेधा उडून गेली आहे! नंतर त्यानें ती सर्व अंधमालिका एकत्र केली, व त्या सर्वांचे डोळयांवरून हात फिरवितांच त्यांच्या दृष्टि पूर्ववत् झाल्या!! मग एकनाथानें त्या सर्वांच्या पुढें घरांतील सर्व चीजवस्तु आणून ठेविली; आणि ती 'खुशाल घेऊन जा' म्हणून सांगितलें. परंतु ते आधींच गर्भगळित झाले होते. त्यांनीं नाथांची क्षमा मागून आपलें वर्तन सुधारिलें.

## चमत्कार सहावा

नंदीचें उड्डाण—एके समयीं पैठणांत कोणीएक संन्याशी आला. त्याचा नेम असा असे कीं, कोणीही भेटलें तरी त्यास नमन करावयाचें, मग तो वंद्य, मनुष्य असो किंवा पशु असो. एके समयीं ह्या संन्याशानें एक मृत पशु पडलेला होता त्याला नमन केलें. तेव्हां ही गोष्ट धर्मबाह्य झाली असें म्हणून पैठणच्या लोकांनीं त्या संन्याशाला बहिष्कृत केलें.

संन्याशानें तो प्रकार पाहून कमंडलूंतील थोडें उदक घेतलें व तोंडानें मंत्र म्हणून त्या मृत पशूवर सिंचन केलें! इतक्यांत तो पशु खडबडून उठला व नाचत धांवूं लागला!!

ह्या प्रकार पाहून पैठणकरांनीं त्या संन्याशाला शुद्ध केलें, व अशाच प्रकारचा कांहीं चमत्कार दाखवा म्हणून एकनाथास त्यांनीं विनंति केली. त्यावरून एकनाथ

एके दिवशीं शिवालयांत भजन करीत असतां, असा प्रकार घडला कीं, एकनाथाचें भजन ऐन रंगांत आलें आहे, ताळमृदंगादिकांच्या ध्वनीनें शिवालय नादून जाऊन गाभाऱ्यांतून प्रतिध्वनि ऐकूं येत आहे; श्रोत्यांचें मन भजनांत गढून गेलें आहे. एकनाथाची अभंगवाणी गिरिजारमणाचा धांवा करीत आहे इतक्यांत सभामंडपांतील शिवापुढला पाषाणमय नंदी स्थानावरून उठला, आणि एकनाथाजवळ येऊन त्यानें नाथाज्ञेवरून तेथील गवत खाल्लें. सर्व लोक हा अमानुष प्रकार पाहून आश्चर्यभरांत निमग्न झाले. नंतर तो नंदिकेश्वर तेथून निघाला आणि नाथाचें भजन समाप्त झालेलें पाहून त्यानें उंच उड्डाण करून गोदावरींत धाड्दिशीं उडी घातली; हा नंदी त्या नदींत अजून आहे; व पैठणास जाणाऱ्यांच्या तो दृष्टीस अजून पडतो.

## चमत्कार सातवा

निरिच्छता—पैठणांतील एका ब्राह्मणानें आपल्या जवळचा परीस एकनाथाजवळ ठेवून आपण कांहीं जरूरीच्या कामाकरितां दूर देशीं निघून गेला. एकनाथानें तो परीस घेऊन देव्हाऱ्याखालीं ठेविला. पुढें ह्या गोष्टीला बरींच वर्षें लोटलीं. एकनाथाला त्या परिसाचें स्मरण न राहून एके दिवशीं निर्माल्याबरोबर तो परीस गंगेंत गेला. ब्राह्मण परत आल्यावर त्यानें आपला परीस परत मागितला. तेव्हां एकनाथास स्मरण होऊन देव्हारा झाडून पहातो तों, कोठेंच परीस सांपडेना. तेव्हां ब्राह्मण मनांत फार खट्टू झाला आणि ह्या मानकाप्यानेंच (एकनाथानें) माझ्या परिसाचा अभिलाष केला असें म्हणून तो ब्राह्मण एकनाथास शिव्या देऊं लागला.

एकनाथानें त्या ब्राह्मणाचें बोलणें शांतपणें ऐकून घेतलें, नंतर त्या ब्राह्मणाला घेऊन एकनाथ गोदा नदींत गेला व हातानें तींतील दगड वर काढून ब्राह्मणास म्हणतो, 'ह्यांमधील तूं आपला परीस ओळखून घे.' ब्राह्मणास प्रथम असें वाटलें कीं, हा माझी थट्टा करीत आहे. मग बरोबर आणलेल्या लोखंडाच्या खिळ्यांनीं दगडास स्पर्श करून पहातो तों, एकनाथाच्या ओंजळीमधील प्रत्येक दगड परीस आहे! मग त्यापैकीं आपल्या ओळखीचा एक परीस घेऊन ब्राह्मणानें एकनाथाच्या विलक्षण पराक्रमाची फार तारीफ केली. नंतर एकनाथानें बाकीचे परीस पूर्ववत् नदीमध्यें टाकतांच ते सर्व पहिल्यांप्रमाणें पाषाण झाले.


## चमत्कार आठवा.

नाथांचा रांझण—एकनाथाची निस्सीम भक्ति, त्याचा निर्धार व त्याचें शुद्ध अंतःकरण, ह्यांच्या योगानें संतुष्ट होत्साते श्रीभगवान् ब्राह्मणाच्या रूपानें, निरंतर साधुसमागम असावा म्हणून एकनाथाचे घरीं राहिले होते. त्या ठिकाणीं, कृष्णंभट हें नामाभिधान धारण करून, एकनाथाची शुश्रूषा करीत होत्साते,

द्वादश वर्षेपर्यंत भक्ताची सेवा चाकरी करीत, देवाधिदेव राहिले. कृष्णंभट हा प्रत्यक्ष भगवान् आहे हें कोणास ठाऊक नव्हतें. कृष्णंभटानें एकनाथाचें पूजेचें साहित्य तयार करून द्यावें, त्याला गंध उगाळून द्यावें, नाथाचे घरीं कावडीनें पाणी भरावें व हरएक प्रसंगीं देवानें आपल्या भक्ताची बाजू राखावी.

पुढें अशी गोष्ट घडून आली कीं, कोणी एक ब्राह्मण श्रीकृष्णाचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें म्हणून भयंकर तपश्चर्येस बसला असतां, कांहीं वर्षांनीं त्याला दृष्टांत झाला कीं, 'प्रतिष्ठानपुरींत कृष्णंभट या नांवानें, माझ्या सद्भक्त एकनाथाचे घरीं माझा शोध कर. म्हणजे तेथें मी तुला दर्शन देईन.'

तो ब्राह्मण त्या दृष्टांताप्रमाणें पैठणांत एकनाथाच्या घराचा शोध करीत आला. आंत आल्यावर एकनाथाला 'तुमचे घरीं कृष्णंभट असतात ते कोठें आहेत?' म्हणून विचारिलें; हें ऐकून एकनाथानें कृष्णंभटास हाक मारिली. हाक मारल्याबरोबर पहातात तों, शंखचक्रगदापद्मधारी देदीप्यमान चतुर्भुज कृष्णमूर्ति घरांतून बाहेर आली; व एकनाथानें आणि त्या ब्राह्मणानें साष्टांग नमन केल्यावर, तो असह्य तेजोराशि तेथेंच अंतर्धान पावला!




# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# वैदिक मंत्रांचा विनियोग

—प्रा. कृ. र. पोतदार, एम्. ए. डि. लिट्.

ऋग्वेदादि वेदांतील मंत्र वेगवेगळ्या कालखंडांत वेगवेगळ्या प्रकारें यज्ञयागादि क्रियांमध्यें उपयोगांत आणले गेले आहेत. अर्थात् सगळ्या सूक्तांतील सगळ्या ऋचांचा विनियोग दाखविला गेला आहे असें नाहीं किंवा सगळ्या सूक्तांच्या बाबतींत तो दाखवितां आला असता असेंहि नाहीं. सगळे योग किंवा श्रुतिकालानंतर प्रचारांत आणल्या गेलेल्या इतर क्रिया वेदकालीं अस्तित्वांत नव्हत्या. अर्थात् तीं सूक्तें त्या यागादि क्रिया दृष्टीसमोर ठेवून लिहिलीं गेलीं नव्हती हें स्पष्ट आहे. तरीही वेदकालानंतर यागादि क्रियांस प्राप्त झालेल्या अभूतपूर्व महत्त्वामुळें विनियोगाचें स्वरूप समजणें अपरिहार्य झालें. इतकेंच नव्हे तर वेदाचा अर्थ समजण्यास ज्या गोष्टी मूलभूत समजल्या जाऊं लागल्या, त्यांत विनियोगाचा अंतर्भाव करण्यांत आला.

अविदित्वा ऋषिं छन्दो दैवतं योगमेवच ।<br>
योऽध्यापयेज्जपेद्वापि पापीयाञ्जायते तुसः ॥<br>
ऋषिच्छन्दो–दैवतानि ब्राह्मणार्थं स्वराद्यपि ।<br>
अविदित्वा प्रयुञ्जान्ते मन्त्रकण्टक उच्यते ॥

सायणाचार्यांनीं वेदभाष्य लिहितांना हा दंडक अगदीं कांटेकोरपणे पाळला व त्यामुळें वेदांतील ऋचांच्या अर्थनिष्पत्तीकरितां विनियोग समजणें अवश्य वाटूं लागलें.

तेव्हां विनियोगाची ऐतिहासिक पूर्वपीठिका समजून घेणें हें अगदीं अगत्याचें आहे.

ऋग्वेद हा सर्व वेदांतील जुना वेद. जरी अथर्ववेदांतील कांहीं सूत्रें ऋग्वेदांतील सूक्तांच्या समकालीन असूं शकलीं तरी एकंदरींत अथर्ववेद हा नंतरचा व ऋग्वेदाच्या तुलनेनें स्थूलमानतः त्याचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण वेगळा. तेव्हां काल-गणनेच्या व सांस्कृतिक महत्त्वाच्या दृष्टीनें ऋग्वेदाचें स्थान अपूर्व असें आहे. ऋग्वेद ही १०२८ सूक्तांची संहिता आहे. दहा मण्डलांत विभागलेलीं हीं सूक्तें विविध प्रकारच्या देवतांच्या स्तुत्यर्थ लिहिलीं गेलीं. सूक्तांची मंडलान्तर्गत रचना जरी वरवर चाळून पाहिली तरी असें दिसून येईल कीं, हीं सूक्तें निरनिराळ्या काळीं व प्रसंगीं लिहिलीं गेलीं होतीं. आद्यसंहिताकाराच्या दृष्टीपुढें यज्ञयागीय विनियोगाची कल्पना

मुळींच नसावी असें स्पष्ट दिसतें. कारण ज्या तत्त्वावर सूक्तांची संहिता बनविली गेली त्यांचा यज्ञयागाशीं कांहींहि संबंध नव्हता. प्रथम ग्रथित केलेल्या दोन ते सात या मंडलांकडे दृष्टिक्षेप केला तर असें दिसेल कीं, त्यांतील सूक्तें प्रथम अग्नि, नंतर इंद्र, पुढें विश्वदेव व तदनंतर इतर देवता अशा देवता क्रमानें ग्रथित केलीं गेलींआहेत. या सूक्तसमूहांच्या शेवटीं येणारीं कांही सूक्तें नवव्या मंडलांत एकत्रित केलेलीं सोमसूक्तें व उरलेल्यांचा प्रत्येकीं १९१ सूक्तें यामध्यें पहिलें व दहावें या दोन मंडलांत केलेला समावेश इत्यादि गोष्टींवरून स्थूलमानानें साधारणतः तीन वेळां तरी संहितेंतील सूक्तांचें ग्रथन व विरचन केलें गेलें असें दिसून येईल. त्यापैकीं विनियोगाच्या दृष्टीनें नवव्या मंडलांतील सोमसूक्तांचें एकत्रीकरण ही महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. कारण ज्यावेळीं २ ते ७ या मंडलांतील सूक्तें ग्रथित केलीं गेलीं, त्यावेळीं कुटुंब-संस्थापक ऋषीच्या नांवाचें आकर्षण संहिताकाराच्या डोळ्यांपुढें प्रामुख्यानें होतें, पण सोमसूक्तांची दैवतसंहिता बनवितांना सोमदेवता व सोमयाग यांचें तत्कालीन प्रचलित महत्त्वच कारणीभूत झालें असलें पाहिजे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाहीं.

त्यापैकीं बऱ्याचशा सूक्तांत, सोमरस काढणें, वेगवेगळ्या भांड्यांत तो सांठविणें यापलीकडे दुसरें वर्णन नसतें व यावरून जरी तीं सूक्तें यज्ञयागांत उपयोगांत आणलीं जाऊं लागलीं तरी अमुक एक यागाकरितांच तीं रचिलीं गेलीं असें म्हणतां येणार नाहीं. तरीहि त्यापैकीं कांहीं सूक्तें ग्रथित केलीं जाण्यापूर्वी अमुक एका प्रकारें यज्ञयागांत उपयोजिलीं जाऊं लागलीं होतीं असें दिसून येतें व त्यामुळें नववें मंडल हें विनियोगाच्या सोयीकरितां वेगळें केलें गेलें. या कल्पनेस पुष्टि मिळते. उदा० नवव्या मंडलांतील ११२, ११३ व ११४ या तिन्ही सूक्तांतील प्रत्येक ऋचेच्या शेवटीं 'इन्द्रायेन्द्रो परिस्रव' ( सोमरसा, इन्द्राकरितां सर्व बाजूंनी वहात रहा ) (४०ये ) अशी ओळ जोडली आहे. ११२ व ११४ या दोन सूक्तांतील ऋचांचा त्या ओळींशीं अर्थाच्या दृष्टीनें कांहींसा संबंध आहे, पण ११२ व्या सूक्तांतील ऋचाच्या बाबतींत तसा संबंध बिलकूल दिसत नाहीं. यावरून संहितेंत तें सूक्त येण्यापूर्वीच 'इन्द्रायेन्दो' इत्यादि ओळीसह तें सूक्त प्रचलित होतें व अर्थात् तें तसें प्रचलित होण्याचें कारण त्याचा सोमरस काढतांना करण्यांत येणारा विनियोग हेंच असलें पाहिजे हें स्पष्ट आहे.

ऋग्वेदाचीं सूक्तें संहिता स्वरूपांत ग्रथित होण्यापूर्वीच सोम व इंद्र यांचें परस्पर साहचर्यानें वाढलेलें महत्त्व लक्षांत घेतां ऋग्वेदीय आर्यांच्या जीवनांत यज्ञाच्या कल्पनेचें व प्रयोगाचें स्थान दृढमूल झालें होतें असें दिसून येईल. जरी ऋग्वेदांतील बहुसंख्य सूक्तें यज्ञयागाच्या प्रयोगाच्या दृष्टीनें रचिलीं गेलीं नसलीं व अन्तर्गत पुराव्यानें हें सहज समजण्यासारखें आहे—तरी कांहीं सूक्तें तरी यागप्रयोग डोळ्यांसमोर ठेवून रचिलीं गेलीं असावीं असें दिसून येतें. उदा० दानस्तुति सूक्तें, वालखिल्यसूक्तें,

आप्रीसूक्तें इत्यादि—आप्रीसूक्तांची रचना लक्षांत घेतां कांहीं तरी विशिष्ट यागक्रिया त्यास अभिप्रेत आहे यांत कांहीं संशय वाटत नाहीं.

अशा रीतीनें यज्ञप्रयोग सार्वत्रिक झाले असतां त्यावेळीं सूक्तांच्या विनियोगाच्या साहाय्यानें सूक्तांच्या अर्थनिष्पत्तीस क्वचित् मदत होत असे असें ऋग्वेदांतील एका मंत्रावरून दिसून येतें. दहाव्या मंडलाच्या ७१ सूक्तांतील तिसऱ्या ऋचेंत 'यज्ञेन वाचः पदवीयमायन्' म्हणजे यज्ञामुळें वाचेचा मार्ग सुगम झाला, अर्थात् अर्थ निष्पत्ति सुकर झाली असें विधान आढळतें.

एका मंत्रद्रष्ट्या ऋषीनें केलेलें हें विधान 'कवीनां पुनराद्यांना वाचमर्थोनुधावति' या न्यायानें अर्थपूर्ण असलेलं दिसून येईल. कारण ऋग्वेदादि वेदानंतर ज्यावेळीं इतर ग्रंथनिष्पत्तीस सुरुवात झाली तेव्हांपासूनच ऋग्वेदाच्या अर्थाबद्दल पंथभेद, मतभेद उत्पन्न झाले. वेगवेगळ्या ग्रंथकारांनीं ऋग्वेदाचा यज्ञपर अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यांतूनच ब्राह्मण ग्रंथांची निष्पत्ति झाली. अर्थात् त्या ग्रंथांचा मूळ हेतु ऋग्वेदाचा अर्थ लावणें हा नव्हताच, त्यामुळें फक्त हव्या असलेल्या ठिकाणींच असा अर्थ लावण्याचा प्रयत्न झाला. एकंदरींत यज्ञांतील विनियोगाच्या साहाय्यानें ऋग्वेदाचा अर्थ लावण्याच्या प्रथेस फार प्राचीन काळीं सुरुवात झाली असें दिसून येईल.

ब्राह्मणकालीं यज्ञयागादि कर्मकांडास प्राप्त झालेल्या अवास्तव महत्त्वामुळें व ऋचांचा विनियोग केवळ तांत्रिकपणें करण्यांत येऊं लागल्यामुळें नवीन सूक्तरचनेच्या अभावामुळें, ऋग्वेदमंत्राच्या अर्थास गौणस्थान प्राप्त झालें. इतकेंच नव्हे तर वेदमंत्र निरर्थक आहेत असेंही मत प्रचलित झालें व यास्काचार्यांनीं निरुक्तांत ज्या प्रकारें या मताचें खंडन केलें आहे तें पाहतां, ऋग्वेदादि वेदांचा अर्थ समजणें त्या काळींही मुष्कील झालें होतें असें दिसून येतें. यास्काचार्यांनीं घालून दिलेल्या शास्त्रशुद्ध पायंड्यामुळें तदुत्तरकालीन वेदाभ्यासकांचें कार्य बरेंच सुकर व सुरळीत झालें असें म्हणतां येईल.

यास्काचार्यांच्या काळींही विनियोगाच्या साह्याय्यानें वेदाचा अर्थ लावण्याची एक परंपरा उपलब्ध होती असें दिसतें. कारण त्यांनीं 'ऐतिहासिक' 'नैरुक्त' इत्यादि मतप्रणालीबरोबरच 'याज्ञिक' मतप्रणालीचा उल्लेख केलेला आहे व हे 'याज्ञिक' यज्ञाच्या अनुरोधानें वेदांचा अर्थ लावीत होते असें निरुक्तांतील उल्लेखांवरून स्पष्ट होतें.

यास्काचार्यांच्या बरोबरच सायणाचार्यांनीं उल्लेखिलेल्या आणखी तीन ग्रंथांचा येथें थोडक्यांत परामर्श घेणें जरूर आहे व हे तीन ग्रंथ म्हणजे १ बृहद्देवता २ सर्वानुक्रमणी व ३ ऋग्विधान हे होत.

'बृहद्देवते'मध्यें ऋग्वेदांतील मंत्रांच्या देवतांचें तत्कालीन उपलब्ध असलेल्या विनियोगाच्या परंपरेला अनुसरून वर्णन केलेलें आहे. बृहद्देवता हा ग्रंथ शौनकानें लिहिलेला आहे. कात्यायनानें लिहिलेल्या ऋग्वेदाच्या सर्वानुक्रमणीमध्यें सूक्तांचीं प्रतीकें, ऋचांची संख्या, मंत्रद्रष्टे ऋषि, मंत्रांचीं वृत्तें या सर्वांचा उल्लेख केलेला आहे व ग्रंथकर्त्यांच्या मतें या सर्व गोष्टी कळल्याशिवाय श्रौत व स्मार्त यागादि क्रिया करतां येणार नाहींत. अर्थात् येथें विनियोगांचा प्रत्यक्ष उल्लेख केला नसला तरी विनियोगाच्या सोयीकरितां हा ग्रंथ लिहिला गेला हें स्पष्ट आहे. तिसरा ऋग्विधान हा ग्रंथ शौनकानें लिहिला अशी परंपरा आहे. विद्वानांच्या मतें शौनकाच्या चरणांत ( School ) कोणीतरी हा ग्रंथ लिहिला असावा; कारण याशिवाय 'बृहद्देवता', ऋक्प्रातिशाख्य, अनुवासानुक्रमणी वगैरे ग्रंथही शौनकाच्याच नांवानें उपलब्ध आहेत. ऋग्विधान या ग्रंथांत तत्कालीन परंपरेला अनुसरून ऋग्वेदांतील मंत्रांचा यागादि क्रियांत केला जाणारा विनियोग वर्णन केलेला आहे.

ऋग्वेदांतील मंत्रांच्या विनियोगाचें साधारणतः सविस्तर वर्णन करणारा आद्य ग्रंथ या दृष्टीनें 'ऋग्विधान' या ग्रंथाचें महत्त्व आहे. ग्रंथाच्या प्रास्ताविक भागांत ग्रंथकर्त्यानें असें म्हटलें आहे कीं, मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं प्रयोजनपूर्वक मंत्र पाहिले व तें प्रयोजन वर्णन करणें हें या ग्रंथकर्त्याचें उद्दिष्ट आहे. या विधानावरून असें दिसून येईल कीं, साधारणतः ऋग्वेदांतील सर्व मंत्र प्रयोजनमूलक आहेत असें ग्रंथकर्त्याचें मत आहे व त्या दृष्टीनें पहिल्या अध्यायाच्या ६६ व्या श्लोकांत पहिल्या मंडलांतील पहिल्या सूक्तांतील सुरुवात करून चौथ्या अध्यायाच्या १२५ व्या श्लोकांत दहाव्या मंडलांतील १९१ व्या सूक्ताचा उल्लेख ग्रंथकर्त्यानें केला आहे. असें जरी असलें तरी ऋग्वेदांतील सगळ्या १०२८ सूक्तांचा विनियोग ग्रंथकर्त्यानें सांगितलेला नाहीं. त्याशिवाय काहीं सूक्तांचा उल्लेख निरनिराळ्या प्रयोजनांत केलेला आहे.

उदा० पहिल्या मंडलांतील ३६–४१, ४४–४९, दहाव्या मंडलांतील १७९–१८३, १८६–१८८ इत्यादि सूक्तांच्या विनियोगाबद्दल ग्रंथकर्त्यानें मुग्धता स्वीकारली आहे. शिवाय कांहीं सूक्तांतील फक्त कांहीं ऋचांचाच विनियोगाच्या दृष्टीनें उल्लेख केलेला आहे. उदा० १–२३–१६–२४ ( अध्याय १, श्लोक ९१ ) यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, ऋग्विधानाच्या द्वारेंसुद्धां ऋग्वेदांतील सर्वच्या सर्व सूक्तांतील मंत्रांचा विनियोग उपलब्ध नव्हता. तेव्हां मंत्रद्रष्ट्या ऋषींना अभिप्रेत असलेला विनियोग वर्णन करण्याची ग्रंथकाराची भूमिका म्हणजे परंपरेनें त्याच्या वेळीं उपलब्ध असलेला मंत्रांचा विनियोग वर्णन करणें या मर्यादित अर्थानेंच समजली पाहिजे.

सामवेदाचा विनियोग वर्णन करणारा 'सामविधान ब्राह्मण' नांवाचा ग्रंथ

आहे. ऋग्वेदानंतर सामवेद व यजुर्वेद हे वेद अस्तित्वांत येण्याचें प्रमुख कारण म्हणजे यागादि क्रियांची अभिवृद्धि हेंच होय. सामवेदांत तर बहुसंख्य मंत्र ऋग्वेदांतीलच आहेत. यजुर्वेद संहिता यागक्रिया करितांच रचली गेली हें त्या संहितेच्या नांवा-वरूनच स्पष्ट होते. अर्थात् एका दृष्टीनें यज्ञीय विनियोगाच्या वर्णनाकरितांच हे दोन वेद प्रचारांत आले हें स्पष्ट आहे. त्याच सुमारास यज्ञयागादि क्रियांचें केवळ भाष्यें या स्वरूपानें लिहिल्या गेलेल्या ब्राह्मण ग्रंथांच्या रचनेस सुरुवात झाली. यज्ञक्रियांच्या विविध अंगांचें सविस्तर वर्णन करणें एवढेंच केवळ या ग्रंथांचें स्वरूप नाहीं, तर त्या क्रियांत विनियोजिलेल्या मंत्रांचें विविध प्रकारें—क्वचित् व्युत्पत्ति देऊन किंवा अर्थ-वादात्मक प्रसंग वर्णन करून—समर्थन करण्याचाही प्रयत्न केलेला आपणांस बऱ्याच ठिकाणीं दिसून येतो. या समर्थनाच्या औचित्याबद्दल अर्थात्च अभ्यासकांमध्यें बरेच मतभेद आहेत. कारण कित्येक ठिकाणीं अगदीं उघडपणें मंत्रांच्या व शब्दांच्या अर्थांची केवळ विनियोगाच्या सोयीकरितां ओढाताण केलेली दिसून येते व ही ओढा-ताण केवळ उपलब्ध व नवीन प्रचारांत येणाऱ्या विनियोगाचे समर्थन करण्याच्या दृष्टीनें केली गेली हें स्पष्ट दिसून येतें.

या वेदब्राह्मणादि ग्रंथांना ' श्रुती 'चें स्वरूप प्राप्त झाल्यानंतर त्या यज्ञयागादि क्रियांचें विस्तरशः वर्णन करणें, यागाच्या सोयीकरितां उपलब्ध साहित्याची सोईस्कर रचना करणें व क्वचित् प्रयोगाच्या सौकर्याकरितां प्रसंगानुसार व प्रचारानुसार पुस्त्या जोडणें हेंच तदुत्तरकालीन ग्रंथांचें स्वरूप राहिलें.

या दृष्टीनेंच वेदांची विविध शाखांची श्रौत व शुल्व सूत्रें रचिलीं गेलीं. श्रौत-सूत्रांमध्यें यागांच्या विविध अंगांची चर्चा आहे तर शुल्वसूत्रांत यागांत तांत्रिक भागांची चर्चा आहे. हें सर्व साहित्य अर्थात्च विनियोगाच्या सोयीकरितांच अस्ति-त्वांत आलें. या श्रौत क्रियांशीं संबंध असलेल्या साहित्यांत वर्णिलेल्या विनियोगास श्रौत विनियोग म्हणतां येईल. पण त्याच वेळीं काळाच्या ओघानेंच दैनंदिन गृह-जीवनांत निरनिराळे विधि व संस्कार यांची भर पडत होती. हे विधि व संस्कार यांचें एक वेगळेंच तंत्र निर्माण झालें. या विधि व संस्कारांची, श्रुति व सामाजिक आचार या दोहोंशीं सांगड घालण्यांत आली व त्याकरितां निरनिराळ्या वेदांची गृह्य व धर्म सूत्रें लिहिलीं गेलीं. या ग्रंथांत वर्णन केलेल्या या संस्कारादि क्रियांच्या विनियोगास स्मार्त विनियोग म्हणतां येईल. एकच ठळक उदाहरण घ्यावयाचें तर यज्ञ कल्पनेच्या स्थैर्याकरितां उपलब्ध पशुयागादींच्या जोडीला आणून बसविलेल्या लाक्षणिक पंचमहायज्ञांचें देतां येईल. या कल्पनेमुळेंच विस्कळीत होऊं पहाणारी किंवा झालेली हिंदुधर्माची घडी पुन्हां सुरळीत झाली हें ऐतिहासिक सत्य आहे. या नवीन यागांबरोबरच यागाच्या कल्पनेला एक वेगळी कलाटणी मिळाली व वैदिक मंत्रांच्या

विनियोगाकडे पहाण्याची एक व्यापक दृष्टी निर्माण झाली. इतिहासाच्या साक्षीप्रमाणें जुन्या यज्ञयागादि क्रियांचें पुनरुज्जीवनही झालें. पण यज्ञप्रयोगांकडे पाहाण्याची एक तात्त्विक दृष्टि निर्माण झाली. मंत्रांच्या विनियोगाला एक तात्त्विक बैठक दिली गेली व त्यामधूनच ' पूर्वमीमांसा शास्त्र ' भारतांत आलें.

वैदिक मंत्रांच्या विनियोगाची ऐतिहासिक उत्क्रांति अशाप्रकारें झाली.

मंत्र प्रत्यक्षतः कसे उपयोगांत आणले गेले व जात असत या गोष्टीकडेही संक्षेपानें दृष्टिक्षेप केला पाहिजे. ऋग्वेदाच्या काळीं सर्व सूक्तें विनियोगाकरितांच लिहिलीं गेलीं नव्हतीं हें आपण पाहिलें. पण आरंभीं जीं सूक्तें यज्ञाकरितां लिहिलीं त्यांचें यज्ञप्रयोगांच्या वेळीं पठन होत असावें असें दिसतें. इतकेंच नव्हे तर नवीन प्रयोगास नवीन सूक्त असावें अशा भावनेनेंच निरनिराळ्या सूक्तांची रचना झाली असावी. साधारणतः एकाच गोष्टीच्या वर्णनानें युक्त अशी निरानिराळीं सोमसूक्तें हेंच दर्शवितात. पण नंतर जेव्हां नवीन सूक्तानिर्मिति थांबली—सूक्तांच्या संहिता बनविल्या गेल्या व यागक्रियेला प्राप्त झालेल्या तांत्रिक स्वरूपामुळें नवीन सूक्त रचनेला अवकाशच राहिला नाहीं तेव्हां जरूरीप्रमाणें किंवा परंपरेप्रमाणें सूक्तांचा अंशतः उपयोग करण्यांत येऊं लागला, निरनिराळ्या सूक्तांतील निरनिराळ्या ऋचांचा क्वचित् एकत्र विनियोग करण्यांत येऊं लागला व विनियोगाची तांत्रिक परंपरा निर्माण झाली. क्वचित् एकाद्या देवतेच्या विशिष्ट स्वरूपाचें वर्णन करणारे मंत्र एका ठिकाणीं आणले गेले, क्वचित् केवळ शब्दसादृश्यामुळें अर्थाकडे पूर्णतया दुर्लक्ष करूनही विनियोग करण्यांत येऊं लागला. क्वचित् नवीन प्रचारामुळें परंपरेच्या अभावीं कांहीं सूक्त भागाची विनियोगाकरितां निवड करण्यांत आली व अशा प्रकारें विनियोगाची कल्पना व तंत्र या दोहोंत वृद्धि झाली. वैदिक मंत्रांच्या विनियोगाची चर्चा करणाऱ्या विविध-कालीन ग्रंथांच्या तौलनिक—तुलनात्मक अभ्यासानें आर्यांच्या सामाजिक व धार्मिक कल्पनेंतील उत्क्रांतीवर बराच प्रकाश पडेल असें आपणांस खात्रीनें म्हणतां येईल.



# श्रीसाईनाथ हॉस्पिटल शिर्डी फंड

## मुंबई ऑफिसांत जमा

दिनांक १२-८-६५ ते ३१-१२-१९६५ पर्यंत रेफ्रीजेटरसाठीं.

| | | |
|---|---|---|
| श्री. ए. डी. मिस्त्री | मुंबई | रु. ४८२-०० |
| ,, जे. बी. मेहता ३ रा हप्ता | घाटकोपर | ३००-०० |
| ,, आर. व्ही. श्रॉफ | माटुंगा | २०१-०० |
| मे. गोल्ड सोप कंपनी | मुंबई | ८६-०० |
| श्री. के. ए. उ. कार्ले | उरण | ८५-०० |
| ,, के. ए. धुलीया | मुंबई | ५१-०० |
| ,, एन्. आर. श्रीमानंत | ,, | ५१-०० |
| कु. एस. अमरजा | मद्रास | ५०-०० |
| श्री. सी. राजगोपाल | शिव | ५०-०० |
| ,, एस. के. केरकर | मुंबई | ५०-०० |
| ,, व्ही. एन्. राज | ,, | २५-०० |
| श्रीमती मेहरू पी. सिधवा | ,, | २१-०० |
| श्री. साई भक्त | ,, | १५-०० |
| ,, जे. एम्. मुडबीद्री | ,, | १०-०० |
| ,, जी. आर. भट | ,, | १०-०० |
| ,, एम्. जी. भट | ,, | १०-०० |
| ,, पी. पी. व्ही. नंबीआर | ,, | १०-०० |
| ,, गोपाळ आयंगार | शिव | ७-०० |
| सौ. मनोरमाबाई कुळकर्णी | मुंबई | ११-२१ |
| श्री. प्राणलालजी | ब्रह्मपुरी | ५-२५ |
| ,, एस. आर. वैद्य | अंधेरी | ५-०० |
| ,, व्ही. बी. वैद्य | मालाड | ५-०० |

## चेकनें आलेले

| | | |
|---|---|---|
| श्री. एम. डी. मेहता | मुंबई | २५००–०० |
| ,, श्री. सूर्यप्रकाश | यादगिरी | ५००–०० |
| ,, रासिक शहा | मुंबई | १९३–०० |
| लेफ्ट. क. दयाशंकर | दिल्ली | १५१–०० |
| श्री. एन्. आर मिस्त्री | मुंबई | १०१–०० |
| डॉ. होमी बाटलीवाला | ,, | १०८–०० |
| डॉ. चंपा आफळे | दिल्ली | ३३–०० |
| श्री. के. आनंदराव | धारवाड | १५–०० |
| ,, आर. एच. टीपणीस | बल्ली | २२–०० |
| ,, बी. वाय. गुप्ते | दादर | ११–०० |
| सौ. कुसुम शिंदे | मुंबई | ११–०० |
| श्रीमती भिकीबेअ पटेल | गुजराथ | १०–०० |
| श्री. एन्. एन्. कर्णेकर | दादर | ५–२५ |
| डॉ. एन्. डी. दाजी | मुंबई | ५–०० |

## ब्रिटिश पोस्टल ऑर्डर्सनें आलेले

| | | |
|---|---|---|
| श्री. के. के. शास्त्री | लुआनशा | २६५–०० |
| ,, एस. एन्. पटेल | एनडोला | १३२–५० |
| ,, सी. आर. पटेल | लुआनशा | १३२–५० |
| ,, जे. व्ही. ठक्कर | एनडोला | ७९–५० |
| ,, एल. पटेल | इंग्लंड | ६६–२५ |
| ,, एन. राघवन | बाहरेन | ४३–०० |
| ,, टी. बी. कारा | जोहन्सबर्ग | ३९–७५ |
| ,, साईभक्त | मस्कत | २६–५० |
| ,, ए. आर. पाटील | एनडोला | ६६–२५ |

—:०:—

# रामराज्यांतील शासन व्यवस्था

आज चारी बाजूला अंधःकार पसरला आहे आणि प्रत्येक व्यक्ति रामराज्याचीं स्वप्नें पहात आहे! म्हणून वाल्मीकिरामायण आणि एकंदर रामकालासंबंधीं विचार करतांना रामकालीन राज्यव्यवस्था-कीं जी रामराज्य म्हणून मान्यता पावलेली होती ती-कोणत्या प्रकारची होती याचा आपण विचार करूं या. राज्यव्यवस्था मानवी प्रवृत्तीचें नियंत्रण करण्याकरितां जरूर आहेच. मनुष्य जमावानें राहतो आणि मानवी प्रवृत्तीचें नियंत्रण करण्यासाठीं कांही विशिष्ट व्यक्तींची निवड करण्यांत येते-याचें नांव शासन-व्यवस्था.

मानवी प्रवृत्तींचें नियंत्रण करण्याकरितां शासन व्यवस्थेची गरज तर खरीच. राज्यसंस्थेसंबंधीं पूर्णपणें विचार करणारे लोक राज्यव्यवस्था किंवा शासनव्यवस्था हवी कीं नको याविषयीं विचार करीत आहेत, आणि विचार करतां करतां त्यांना असें वाटूं लागलें कीं. राज्यसंस्था असण्यापेक्षां नसलेलीच बरी. आपल्या भाषेंत त्याला शासनाभाववाद किंवा स्वयंशासित समाज म्हणतात, ज्याला इंग्रजी तत्त्वज्ञानांत Anarchy म्हणतात. परंतु अलेक्झांडर बर्कमनसारखे लोक असें म्हणतात कीं, अराज्यवाद म्हणजे अव्यवस्था किंवा गोंधळ नव्हे; चोरी, खून, संपूर्ण जगाबरोबर युद्ध किंवा चंगलीपणा म्हणजे अराज्यवाद नव्हे, तर त्याच्या अगदीं उलट-सुव्यवस्था, शांति, त्याचप्रमाणें दुसऱ्याला न्याय मिळावा ही कल्पना, जीवनांतील अत्युत्कृष्ट नैतिक मूल्यें. जर समंजस स्त्री-पुरुषांनीं ही गोष्ट निर्माण केली तर राज्यव्यवस्था किंवा शासनव्यवस्था यांची गरजच नाहीं. प्रत्येक व्यक्ति आपली नैतिक जबाबदारी ओळखून आणि सामाजिक नैतिक मूल्यांचें महत्त्व जाणून वर्तन करील तर सर्व लोक सुखी होतील; परंतु तें सुखकारक स्वप्न एखादे दिवशीं साकार होणें शक्य आहे काय? अशा तऱ्हेची शंका लोकांच्या मनांत येत आहे.

लोकांना शासनव्यवस्थेशिवाय जगणें ही गोष्ट दिवसेंदिवस अशक्य वाटूं लागली आहे. लोक असें म्हणतात कीं, " राजसत्ता नसेल तर लोक चोरी करतील!" परंतु लोक चोरी कशाकरितां करतात? चोरी करणें ही गोष्ट सोपी आहे काय? अलेक्झांडर बर्कमन म्हणतो कीं-चोऱ्या वाढण्याचें कारण राजसत्ता हें आहे. राजसत्तेमुळेंच नैतिक मूल्यांचें अधःपतन होतें, (Demoralization) होतें. आज सुद्धां आपणां सर्वांना याचा अनुभव येतो. याकरितां आपल्या राज्यांतसुद्धां पुष्कळशीं खातीं (Departments) बंद करण्याचा विचार करीत आहेत.

जर राजसत्ता नसेल तर चोर निर्माण होतील ! पण चोर कोण ? समजा कीं पंचवीस माणसें एका होडींत होतीं. समुद्रांत होडी फुटली आणि माणसें वहात जातां जातां एका निर्जन बेटावर आलीं. त्या ठिकाणीं फळें फुलें वगैरे खूप होतीं आणि सर्व लोक प्रेमानें राहूं लागले. एक दिवस पंचवीस लोकांपैकी जर कोणीं एखादा म्हणूं लागला कीं, "हीं सर्व झाडें माझीं आहेत, त्यावर तुमचा हक्क नाहीं." तर ऐकणारे सर्व लोक हंसतील आणि त्याला समजवतील कीं, "अरे बाबा ! आपण सर्व जहाज फुटल्यानंतर येथें एकदमच आलों, असें असतांना या सर्व वस्तु तुझ्या एकट्याच्या मालकीच्या कशा ? या सर्वांच्या मालकीच्या आहेत." असें असून जर त्यानें इतरांचें मानलें नाहीं तर त्याला उचलून समुद्रांत फेंकून देतील ! आतां जीं २४ माणसें राहतील त्यांपासून अनेक माणसें होतील. तीं सर्व एकजुटीनें राहून आपापलीं कामें करतील. त्यावेळीं एखादी परकी व्यक्ति तेथें येऊन एक कागद दाखवील कीं, "या बेटावर माझा हक्क आहे, हा कागद पहा, रजिस्टर केलेला आहे. ते लोक तो कागदच फाडून टाकतील. नंतर तो मनुष्य चिडून जाऊन एखाद्या शासनसंस्थेच्या आश्रयानें बेटावर चढाई करील, अणुबॉंब टाकील आणि लोकांना जिंकून त्यांच्यावर अधिकार प्रस्थापित करील. तो मनुष्य स्वतःचाच फायदा पाहील. फायदा होण्यासाठीं उत्पादनावर नियंत्रण ठेवील. याकरितां कांही माणसांना काढून लावील व ज्यांची जरूरी असेल त्यांना कामावर ठेवील. आतां काम न मिळाल्यामुळें जे बेकार होतील ते दुसऱ्याच्या धनसंपत्तीकडे पाहातील आणि त्यांना चोरी करण्याची इच्छा होईल. म्हणून राजसत्ता हेंच चोरीचें कारण आहे असें कांहीं विचारवंतांचें मत आहे.

शासनसंस्था जर नसेल तर छगनलाल मगनलालला सुरी मारील असें कोणी म्हणेल, परंतु असल्या प्रकारचा विचार १०० पैकीं फक्त पांचच लोकांच्या मनांत येईल व त्यापैकीं फक्त एकचजण ही गोष्ट अमलांत आणूं शकेल. अमलांत आणण्याचें कारण सुद्धां मानसिक विकृतींत आहे. या मानसिक विकृतीला प्रचलित शासनसंस्थाच जबाबदार आहे. माणसाला मुळीं असेंच वाटतें कीं, आपण शासनसंस्थेशिवाय जगूंच शकणार नाहीं. प्राणवायूइतकीच शासनसंस्था जरूरीची वाटते. परंतु आपण हा विचार करीत नाहीं कीं, राजसत्ता आपल्या जीवनांत नक्की कोणतें कार्य करते ! जीवनोपयोगी वस्तूंमध्यें–अन्न, वस्त्र, निवारा या वस्तू मानवाला आपल्या प्रयत्नांनींच मिळवाव्या लागतात. आजारी पडल्यानंतर आपण पोलीसाकडे जात नाहीं, तर आपण डॉक्टरकडे जातों. निसर्गानें दिलेली अक्कल किंवा बुद्धिमत्ता राजसत्ता वाढवूं शकेल काय ? मृत्युपंथाला लागलेल्या माणसाला राजसत्ता वांचवूं शकेल काय ? आजारीपण, वृद्धत्व, मृत्यु यांपैकीं एका तरी बाबतींत राजसत्ता आपणांला मदत करते काय ?

अशा तऱ्हेनें जीवनोपयोगी कोणतेंहि कार्य राजसत्तेच्या हातांत नाहीं असें

असतांना मग राजसत्तेची जरूरच काय ? व्यवहाराचें नियमन करण्यासाठीं का राजसत्तेची जरूर आहे ? या गोष्टी तर समंजसपणा व सज्जनता यामुळें होत असतात. मोटार डाव्या बाजूनें हांकावी असें सांगण्याकरितां राजसत्तेची जरूर आहे. मोटारवाल्या-पायीं चालणाऱ्या माणसावर मोटार चालवूं नये आणि पायीं चालणारा मोटारीच्या समोर येऊं नये या व्यावहारिक गोष्टी आपणांला समंजसपणा आणि सज्जनता यामुळें समजतील. आणि या गोष्टी जर लोकांना कळल्या नाहींत तर पोलिससुद्धां त्यांना वांचवूं शकणार नाहीं.

म्हणून स्त्री व पुरुष यांमध्यें त्याग, सहिष्णुता आणि बौद्धिक विकास यांची जरूरी आहे. बौद्धिक विकास झाला तरच जीवनांत नैतिक मूल्यांचें स्थान उच्च होईल—म्हणजेच ज्याप्रमाणें मी जगतों त्याप्रमाणें दुसऱ्याला पण जगायचें आहे हें सर्वांना समजेल. मग राजसत्तेची गरजच राहाणार नाहीं; आणि शासन नैतिक मूल्येंच करतील. तत्त्वाज्ञानी म्हणतात कीं, सत्ययुगांत स्त्री–पुरुषांचा अशा तऱ्हेचा विकास झालेला होता :—

**न राज्यं न राजासीन्न दण्ड्यो नच दाण्डिकः ।**
**स्वधर्मेण प्रजास्तावत् रक्षन्ति स्म परस्परम् ॥**

स्वधर्म, स्वकर्तव्य आणि स्वतःचे ठिकाणीं असलेलीं जीं नैतिक मूल्यें त्यांनीं प्रजा स्वतःचें रक्षण करीत होती. नैतिक मूल्यें रक्तांत भिनलेली असल्यामुळें तो आदर्श मानव समाज होता. म्हणून अराज्यवादांत नैतिक मूल्यें प्रत्येकाच्या जीवनांत उतरलीं पाहिजेत व ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. आणि नैतिक मूल्यांनीं युक्त असा समाज निर्माण करावयाचा असेल तर त्याकरितां अगतिक होऊन शासनसंस्थेची आवश्यकता मानणेंच इष्ट होय. परंतु त्यांतही राजसत्तेच्या हातांत कमींत कमी सत्ता असावयास पाहिजे. ज्यांचा नैतिक विकास झालेला नसेल त्यांचा नैतिक विकास करण्याकरितां फक्त निमित्तरूपानेंच शासनसंस्थेनें काम करावयास पाहिजे. रामराज्य राजप्रजासत्ताक राज्य होतें. त्याची आजच्या काळांत कल्पनाच करावयाची असेल तर आजचें इंग्लंडचें राज्य होय. फरक फक्त राजा रामाचा होय.

जी प्रजा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असेल, शिक्षणांत प्रगत असेल आणि संस्कारांत प्रगति केलेली असेल त्याच प्रजेला राज्यांत मत द्यावयाचा अधिकार असावयास पाहिजे. रामकाळांत प्रजेला मत द्यावयाचा अधिकार होता. ज्यावेळीं रामाला युवराजपदावर नेमावयाचें होतें त्यावेळीं पौरजानपदांना बोलावून राजानें त्यांचें मत विचारलें होतें. त्याचे श्लोक बालकांडांत आहेत. "तुम्ही स्वतंत्र आहांत. रामाला राजा म्हणून मान्यता द्यायी किंवा नाहीं हें तुम्ही सांगा." तोच गांवाचा

पुढारी होऊं शकत असे कीं ज्याच्याजवळ हा अमुक पंथाचा असा भेद नसे आणि ज्याच्यासंबंधीं राग–द्वेष नसत. असेंच लोकांचें त्याच्यावर प्रेम असे. आज जाहीर निवडणुकींत निवडून आलेले, आपण ज्यांना पाहिलेलेंहि नाही अशा तऱ्हेचे पुढारी त्या काळांत नव्हते. अशा तऱ्हेच्या पुढाऱ्यांना राजानें बोलावून त्यांचें मत घेतलें होतें.

तत्कालीन घटना अलिखित होती, जशी आज इंग्लंडमध्यें आहे. अहो! घटना काय लिहावची असते? घरांत कसें रहायचें त्याचा काय कायदा असतो? पाठशाळेंत येणाऱ्या लोकांकरितां काय नियम असतात? सज्जनांच्या सभेंत कसें बसावें हें सज्जनांना माहीत असतेंच.

उत्कृष्ट चारित्र्य असलेलाच राज्याधिकारी होऊं शकतो. हा रामराज्याचा पहिला नियम होता. इक्ष्वाकु वंशांतल्या सगर राजाचा मुलगा असमंजस या नांवाचा होता. तो गुणवान् आणि सर्व बाजूंनीं परिपूर्ण होता. तो राज्याचा अधिकारी असतांनासुद्धां लोकांनीं नकार दिल्यामुळें त्याच्या वडिलांनीं त्याला राज्यावर बसविलें नाहीं व जंगलांत पाठविलें. चारित्र्य शिथिल झाल्यामुळेंच सर्वस्वाचा नाश होतो, असें त्या काळच्या लोकांना वाटत असे. इंग्लंडमध्येंसुद्धां राजाला व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं. ज्यांच्या साम्राज्यावर एकाकाळीं सूर्य मावळत नसे अशा त्या राज्याचा भूतपूर्व राजा आठवा एडवर्ड याला सुद्धां अमुकच स्त्रीबरोबर विवाह करणार या आग्रहामुळें रात्रीं बारा वाजतां स्वतःचा देश सोडून कॅनडाला जावें लागलें आणि जातेवेळीं इंग्लंडच्या सिंहासनाचें शेवटचें दर्शन घेण्याची त्याची इच्छाही पूर्ण करण्यांत आली नाहीं. ही आज बिघडलेल्या समाजाची सुद्धां स्थिति आहे, तर कालच्या लोकांची गोष्ट कुठें?

रामाला वनांत पाठविण्याचा दशरथाला सुद्धां काय अधिकार आहे? कोणत्या कारणानें रामाला वनवास प्राप्त झाला? राजानें सुद्धां घटनेप्रमाणेंच चालावयास पाहिजे. "काय रामानें ब्राह्मणांचें धन चोरलें होतें? एखाद्या गरीब किंवा श्रीमंत माणसाला अपराधाशिवाय त्यानें त्यांना लुटलें किंवा मारलें होतें काय? कोण्या परस्त्री-वर रामाचें मन बसलें होतें का? यांपैकीं जर कांहींच घडलें नसेल तर मग "कस्मात्स दंडकारण्ये भ्राता रामो विवासितः" निष्कलंक चारित्र्य असणाराच राज्याचा अधिकारी होऊं शकत असे. परंतु आज तर असें सांगण्यांत येतें कीं, आमचें व्यक्तिगत चारित्र्य पाहूं नका. तर मग रामराज्य येईल का? म्हणूनच राजा, अमात्य तसेंच कोणाही अधिकाऱ्याचें चारित्र्य बारकाईनें पाहिलें जात असे. याच्या एक पाऊल पुढें जाऊन सांगायचें झालें तर रामराज्यांत राज्यकारभार करणाऱ्या व्यक्तीसंबंधींच काय तर त्यांच्या सर्व कुटुंबांतील व्यक्तींच्या चारित्र्यासंबंधीं मोहरीएवढीही शंका घेतलेली चालत नसे.

वाल्मिकी-रामायणांत धोब्याची गोष्टच नाहीं. सीतेच्या चारित्र्यासंबंधीं लोकांना शंका आली त्यामुळेंच सीतेचा त्याग करण्यांत आला, नगरांतील लोक रस्त्यांत जमून चर्चा करूं लागले. "पौराः चर्चन्ति" असें बहुवचन आहे. सम्राज्ञीविषयीं पण चर्चा करण्याची लोकांना मुभा होती. रामकाळांत Autocracy नव्हतीच.

रामकाळांत अष्टप्रधान संस्था होती. राज्यसंस्था चालविणारे अमात्यसुद्धां राजासारखेच विशुद्ध चारित्र्य संपन्न असत. अमात्यांची निवड त्यांचें चारित्र्य पाहूनच करण्यांत येत असे. आजच्याप्रमाणें केवळ बुद्धिमत्ता किंवा पदवीला प्राधान्य देण्यांत येत नव्हतें. ही आठ अमात्यांची संस्था ही कार्यवाही समिती होती. त्यांच्या सल्ल्यानेंच राजा राज्यकारभार करीत असे.

परंतु अमात्यसंस्था राजसत्तेपासून पगार घेत असल्यामुळें ती राजसत्तेपेक्षां खालची होय, त्यामुळें त्यांची योग्यता कमीच, कारण कीं त्यांची उपजीविका राजसत्तेवरच आधारलेली होती. जर राजसत्ता बिघडली तर अमात्यसंस्था जरी अगदीं कितीही चांगली असली तरी राजसत्तेवर कसें काय नियंत्रण ठेवूं शकणार ? कारण ती Inferior असणार. कोणताही 'Ism' या प्रश्नाचें उत्तर देऊं शकणार नाहीं. राजसत्ता नियामक खरी, परंतु जेव्हां पोषणाच्या ऐवजीं शोषण, रक्षणाऐवजीं भक्षण करावयास लागेल त्यावेळीं त्या राजसत्तेचें नियमन कोणती शक्ति करूं शकणार ? 'फॅसिझम् सुद्धां याचें उत्तर देऊं शकत नाहींत. ते लोक एकचालकानुवर्तित्व मानतात. परंतु तो सर्व प्रमुख चारित्र्यवान् नसेल तर त्याला कोण सुधारील ? कम्युनिझम् सर्व प्रमुख मानतो; परंतु तो राक्षस होणार नाहीं याची काय खात्री ? आणि तो जर राक्षस बनला तर त्यावर नियंत्रण कोण ठेवणार ? लोकशाहीमध्यें दर पांच पांच वर्षांनी बदलणाऱ्या राजसत्तेवरसुद्धां पैशानें किंवा कुटिलपणानें खोटी राजसत्ता यश मिळवूं शकली आणि लोकांना त्रास देऊं लागली तर तिचें नियंत्रण कोण करणार ? लोकशाहीत पैसा आणि युक्ति यामुळें तींच माणसें लोकांच्या डोक्यावर बसणार नाहींत याची खात्री काय ? आणि असें जर करतील तर त्यांचें नियंत्रण कोण करणार ? लोकशाही सुद्धां या प्रश्नाचा उलगडा करूं शकत नाहीं.

तेव्हां याचें उत्तर रामराज्य देऊं शकतें. रामराज्यांत राज्याचें नियंत्रण करण्यासाठीं वैराग्य आणि ज्ञानसंपन्न असलेलें, भौतिक आणि लौकिक व्यवहारांत सर नसलेलें, राजसत्तेच्या कृपाप्रसादावर न जगणारें, राजसत्तेची पर्वा न करणारें आणि वेळप्रसंगीं राजसत्तेचाही कान पकडूं शकणारें ऋषिमंडळ होतें. प्लेटोच्या Republic मध्यें सुद्धां अशाच प्रकारची Guardian या संस्थेची कल्पना केलेली आहे. ही कल्पनाच अद्भुत


असल्यामुळें रामराज्यांत उत्कृष्ट व्यवस्था होती. हे लोक अत्यंत विरक्त, निर्भीड आणि आपलें म्हणणें कायद्यांत रूपांतरित करवून घेणारे होते. तपःस्वाध्यायनिरत महामुनि वसिष्ठ या ऋषिमंडळाचे प्रमुख होते.

एकदां राजदरबारांत असा प्रसंग आला कीं—विश्वामित्र राजदरबारांत आले आणि त्यांची पाद्यपूजा करून दशरथ राजा त्यांना म्हणाला, "तुमची काय इच्छा आहे ती मला सांगा, मी ती पुरी करीन." विश्वामित्रांनीं यज्ञाच्या संरक्षणासाठीं दोन्ही राजपुत्रांची मागणी केली. दशरथानें नकार दिला. नवऱ्यानें मारलें, पावसानें भिजविलें, राजानें अन्याय केला तर फिर्याद कोणाजवळ करायची ? तेव्हां विश्वामित्रऋषि अष्टऋषि मंडळाकडे गेले आणि मंडळाचे प्रमुख जे वसिष्ठऋषि त्यांना ही गोष्ट सांगितली कीं— "राजानें दिलेला शब्द पाळला नाहीं. मी राज्यांतून रिकाम्या हातानें परत जात आहें." त्यावेळीं वसिष्ठऋषींनी राज्याची प्रतिष्ठा राखण्यासाठीं राजाला राजपुत्रांना देणें भाग पाडलें.

दुसऱ्या एका प्रसंगीं 'रामायणाच्या शेवटीं कालपुरुष ब्राह्मणाचें रूप घेऊन रामाजळ खासगी गोष्टी करण्याकरितां येतो. तो रामाला एक अट घालतो. "आपणांला दोन गोष्टी बोलायच्या आहेत त्यावेळीं कोणीहि आला तरी त्याला मृत्यूची शिक्षा करावी." कोणी येऊं नये एवढ्याकरितां राम लक्ष्मणाला बाहेर उभा ठेवतो. इतक्यांत एक संकट येतें ! दुर्वासऋषि येतात; आणि सांगतात कीं "मला रामाला भेटायचें आहे." लक्ष्मण नकार देतो. त्यावेळीं रुद्रावतार धारण करून दुर्वासऋषि सांगतात कीं, "जर मला प्रतिबंध करशील तर मी संपूर्ण अयोध्येचें भस्म करीन !" लक्ष्मणावर अशा तऱ्हेनें धर्मसंकट आलें ! लक्ष्मणाला वाटलें कीं "सर्वांचा नाश करवून घेण्यापेक्षां माझा एकट्याचा नाश झाला तरी परवडला. समष्टीसाठीं व्यक्तीनें त्याग केलाच पाहिजे." त्यामुळें ते रामाकडे जाऊं लागले. इकडे राम आणि कालपुरुष यांचें बोलणें पुरें होऊन बाहेर येतात तोंच लक्ष्मणानें मर्यादेच्या आंत पाऊल टाकलें. आणखी थोडा वेळ गेला असता तर लक्ष्मणाला आंत जाण्याची गरजच पडली नसती. त्यानें कांहींहि ऐकलें नव्हतें. तरीसुद्धां लक्ष्मणाच्या हातून गुन्हा घडलाच. आतां काय करावें ? याची चर्चा सुरू झाली. पंडित ( त्या काळचे वकील ) म्हवूं लागले कीं—यानें कांहीं ऐकलेलें नाहींच. कारण त्यांचें बोलणें पुरें झाल्यानंतर राम जवळ जवळ बाहेर आलाच होता, म्हणून हा केवळ "तांत्रिक गुन्हाच समजावा." लक्ष्मणसुद्धां अशा तऱ्हेचा उदात्त चारित्रसंपन्न महापुरुष होता कीं, त्या काळची समाजांतील प्रत्येक व्यक्ति म्हणूं लागली कीं "लक्ष्मणाला देहांत दंड होतांच कामा नये." आणि रामाची आंतरिक इच्छा पण अशीच होती. लक्ष्मणानें राजगादीवर शेंकडो उपकार केलेले होते. अमात्य संस्थेलासुद्धां त्या भव्य, दिव्य आणि तेजस्वी मूर्तीची अत्यंत जरूर होती. प्रभु राम-

चद्राचें अस्तित्त्वच लक्ष्मणामुळें होतें. परंतु वसिष्ठ म्हणाले, " मला आश्चर्य वाटतें कीं एका कुटुंबावर कोणकोणत्या दुःखाची परंपरा कोसळावी ! तरीपण मी सांगतों कीं राजगादीच्या प्रतिष्ठेसाठीं लक्ष्मणाला शिक्षा झालीच पाहिजे ! "

राम लक्ष्मणाला सांगतो कीं, " नियामक सत्तेच्या आज्ञेप्रमाणें तुला जायलाच पाहिजे. " लक्ष्मण म्हणतो कीं, " माझें मोठें भाग्य कीं मृत्यूचा संदेशसुद्धां श्रीराम स्वतः मला देत आहे." लक्ष्मण धांवत धांवत जाऊन सरयू नदीमध्यें जलसमाधि घेतो. त्याच्या पाठोपाठ श्रीराम पण जातो. आणि त्याच ठिकाणीं रामायण पुरें होतें ' म्हणून हें अष्टऋषिमंडळ राजसत्तेचें नियामक होतें. त्याचें काम राजसत्तेला केवळ सल्ला देण्याचेच नव्हतें तर त्याप्रमाणें न वागल्यास तिला वागायला भाग पाडणें हें ही काम होतें.




MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop*. S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

# सुखाच्या शोधांत

लेखक : द. शं. टिपणीस

एक लफंग्या होता. मोठा धूर्त. लोकांना हातोहात बनविण्याची कला त्याला अवगत होती, कारण पूर्व सुकृतामुळें तशी साधनें जन्मतःच त्याच्याकडे होती. शरीरानें सुदृढ व देखणा होता. वाणी मिठास होती. चेहरा असा कीं पाहिल्यावर बडी व्यक्ती असें वाटावें. बोलण्यांत चतुर व हजरजबाबी, ऐकीव ज्ञानाचा भरपूर साठा त्याच्याजवळ होता. वेद, उपनिषधे, गीता, ज्ञानेश्वरी गाथा वगैरे ग्रंथ कीं जे अध्यात्मांत प्रतिपक्षांवर फेकले कीं तो गारीगार होतो त्यांची इकडे तिकडे ऐकलेली माहिती त्याच्याजवळ भरपूर होती. नटनाटकी इतका कीं हल्लीं एखाद्या कला-निकेतनमध्यें असतां तर प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या असत्या. एकंदर व्यक्ति-मत्वच असें कीं लोकांवर छाप पडायची. हें सगळे होते खरे. पण आळशी होता. पैशाचा लोभी, स्त्री चंचल, कामधंदा न करतां विनाकष्ठ ऐश्वर्य मिळावें ही प्रबल इच्छा. ऐश्वर्य मिळविण्याचा सोपा मार्ग तो शोधूं लागला. अनेक धंदे त्यानें हाताळले. शेवटीं अध्यात्मामधला महाराज किंवा बुवा हा धंदा त्याला पसंत पडला. या धंद्याला योग्य असें भांडवल जन्मतःच त्याच्याकडे होतें. मित्रांच्या साह्यानें हा धंदा करावयाचे त्यानें ठरविले. तो महाराज बनला. त्याचें मित्र शिष्य बनले.

एक बऱ्यापैकीं म्हणजे भोळसट समाज असलेलें गांव त्यानें निवडले. गांवा-पासून फार लांब नाहीं पण जवळही नाहीं अशा ठिकाणीं आश्रम स्थापन केला व शिष्यासह तेथें मुक्काम केला. शिष्य निरनिराळ्या वेषानें गांवांत फिरत व महाराजांच्या सामर्थ्याविषयीं अफवा उठवून देत. यामुळें हळूंहळूं आश्रमांत भक्तांची गर्दी होऊं लागली व महाराजांच्या सामर्थ्याविषयीं लोकांची खात्री होऊं लागली. भक्त तरी काय महाराजाप्रमाणेंच पैशाचे, ऐश्वर्याचे, कीर्तिचे लोभी व हावरे. येणाऱ्या लोकांना महाराज नाना उपाय सांगत. बोलाफुलाला दहामध्यें एकाचा फायदाही होई. त्याच्या शिष्यांना गांवांत अफवा उठवायला तेवढेच आणखी भांडवल मिळे. धंदा तेजीत चालला होता. सर्वांकडून आगाऊ पैसा नव्हे दक्षिणा घेण्याची मात्र तो काळजी घेई.

एके दिवशीं एक वयस्कर जोडपे महाराजाकडे आले. बिचाऱ्यांना संतान नव्हते. महाराजांनीं इच्छा पूर्ण करावी म्हणून पायाशीं लोटांगण घातलें. मिठास आशिर्वाद देऊन व अगाऊ फी नव्हे दक्षिणा घेऊन महाराजांनीं त्यांना मार्गदर्शन केले.

"वंध्या स्त्रीच्या सुपुत्राच्या डोळ्यांचे केस घेऊन या. त्याचें मी चूर्ण करून देईन, ते दोघांनी सेवन करा म्हणजे ज्याचा तिन्ही लोकी झेंडा ऐसा गुंडा पुत्र तुम्हास होईल." जोडप्यास आनंद झाला व वंध्या पुत्राच्या शोधार्थ ते निघाले. गांवोगांव फिरले. पण वंध्या पुत्रच मिळेना तेथें डोके कसले व केस कसले. पुत्र असला तर ती स्त्री वंध्या नसे व वंध्या असली तर तिला पुत्र नसे. सगळीकडे हाच मामला.

शेवटीं तीर्थाच्या ठिकाणाचीं त्याने वारी सुरूं केली. उद्देश हा कीं तीर्थाच्या ठिकाणीं ज्ञाते लोक असतात. त्यांतील कोणी एकादा आपल्याला मार्ग दाखविल. पण अनेक तीर्थे करून ते निराश झाले. एका तीर्थाच्या ठिकाणीं ते आले. नदीकिनारी फिरत असतां एक योगी बसलेला त्यांनीं पाहिला. दोघेही त्याच्याकडे गेले व नमस्कार करून बसले. योगी म्हणाला, "तुम्ही थकले भागलेले व काळजीत दिसता. आपल्यावर असें कोणते संकट आहे ?" त्यांनीं आपली हकिकत सांगितली. आपण वंधेच्या सुपुत्राच्या डोक्याच्या केसाच्या शोधांत आहोंत तर कृपा करून आम्हांस मार्गदर्शन करावें. अशी विनंती केली. हें ऐकून योगी हंसला व म्हणाला, 'अहो, कोणीतरी लफंग्यानें तुम्हांस फसविलें आहे. वंध्येला पुत्र कसा असणार ? असला तर ती वंध्या कशी ? वंध्या पुत्र हा आभास आहे. मग डोळे तरी कसे असणार व त्यावर केस तरी कसे येणार ? दुसरें असें कीं वंध्या पुत्रासाठीं गांवोगांव कां हिंडतां ? तुमच्याच वंध्या पुत्राचे केस नेऊन का देत नाहीं ? पूर्व जन्मींच्या सुकृतावर या जन्मीं पुत्रप्राप्ती अवलंबून असते. ऋणानुबंधाच्या या गोष्टी. उगाच खेद करीत कां बसावें ? व भटकण्यांत जीवन फुकट कां घालवावें ? त्यापेक्षां सर्वांचें कल्याण करणारा जो श्रीहरी त्याचें भजन करा. पुत्र मिळाल्यानें नव्हे तर त्याच्याच कृपेनें तुम्हीं सुखी व्हाल.

ऐहिक सुख हें वंध्यापुत्राप्रमाणें आहे. या वंध्यापुत्राच्या शोधांत वणवण फिरत आपण आपलें जीवन वेचीत बसतो. सुख हे नुसते शब्द आहेत. वंध्येचा पुत्र व केवळ या प्रपंचांत सुख दोन्ही अशक्य. सुख हा मनाच्या कल्पनेचा खेळ आहे. आपण मानून घेतों म्हणून सुख म्हणतों. या संसारांत सुखाला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. चमत्कारीक वाटेल हें पण सत्य आहे, प्रापंचीक सुख म्हणजे मृगजळाचें पाणी. माणूस आशेनें सुखामागें धावतो पण तें त्याच्या हातीं लागत नाहीं. मृगाची तहान त्याला मृगजलामागें धाडतें तर माणसाची आशा त्याला सुखामागें धावडवते. सुखाची आशा करीत आपण दुःखाचें डोंगर पालथे घालतो. व शेवटीं असार हा संसार असें म्हणून मोकळे होतो. सुख पूर्वेला असेल तर आपण पश्चिमेला धावत सुटतों. अभासालाच सुख त्याला धरायला जातों पण हातीं लागतें दुःख आपलें चित्त बाह्य पदार्थांकडे खेचलें जाते. आपणास सुख होईल असें

कांहीं त्यांत नवीन दिसलें कीं सुखासाठीं तें मिळविण्याचा मोह होतो धडपड कष्ट करून तें आपण मिळवितो वाटतं आतां सुखी झालों वाटतं तो अनुभव येतो पुन्हां दुःख पाठीशी आहेच. २०० रु. पगार असला कीं चित्त ५०० कडे खेचले जातें. मन सांगते कीं बेट्या ५०८ मिळालें कीं तूं पूर्ण सुखी होशील. मग कशाचीही दाद नाहीं. रिडिओ येईल पंखा येईल, कोच येतील, टेलरीन मिळेल, सगळा कसा अगदीं आराम. आपण धडपडतों कष्ट करतों हिकमती लढवतों व ५०० रु. मिळवतों. रेडियो वगैरे सर्व येतें. पण मनाला समाधान येत नाहीं. नाविन्य म्हणून प्रथम प्रथम रेडिओ सारखा खणखणतो. मग कंटाळा, कामांत कटकट, घरांत मतभेद शेवटीं बंदच. सुखासाठीं पदार्थ मिळवावा व त्यांतूनच दुःखें उद्भवूं लागावीं. किती विचित्र हे. जग हें विचित्र लीलाच आहे. न समजेल त्याला, 'उमगल' ज्याला त्याला कांहींच विचित्र नाहीं. सुख मिळवून देणारे पदार्थ हस्तगत करण्यासाठीं आपण जी कर्मे करतो त्यांतच दुःखाचें बीज स्वहस्तें पेरित असतों. मग ज्याचें त्याला या न्यायानें तीं दुःखें आमच्या वाट्यास येणार नाहींत तर मग कोणाच्या ? शांत चित्तानें विचार केल्यास, घरोंघरीची सुखें तपासून पाहिल्यास सहज दिसून येईल कीं सुखासाठीं म्हणून केलेला व्यवहार अंतीं दुःखेच निर्माण करतो. कारण या जगांत सुख असें नाहींच. असलेच तर सुख दुःखाचें प्रमाण १:९९ आहे. पुन्हां तेही रेशनच्या प्रमाणासारखें. चांगली वस्तू अमूक घेतली तर दुसरी एवढी घेतलीच पाहिजे आणि ही दुसरी बहुधा खराब पण घेतलीच पाहिजे. नको असेल तर नंतर टाकून द्या. पण घ्याच. तसेंच सुखदुःख. दुःख कोणाला पाहिजे ? पण घ्यावे. लागतेंच. टाकून देतां येत नाहीं. कारण ती कला आपल्याला अवगत नाहीं. असती तर शंभर टक्के आपण सुखी झालों असतों. कारण दुःखी कमी होणें म्हणजेच सुख. या जगांत कांहीं असेल तर दुःखच आहे. दुःख कमी झालें कीं तेवढ्यापुरतें त्याला आपण सुख म्हणतों. असें मानतों हमालाच्या डोक्यावर भलें मोठें जड असें असतें. उन्हांतून चालतांना घामाघूम होतो. कष्टी होतो. पण तें ओझें कोणी काढून घेतल्यास त्याला हलकें वाटतें व म्हणतो आतां किती बरं वाटतं. घटकाभर सुखाच्या आनंदांत डोलतो. ओझ्याचे दुःख नाहींसे झाल्याबरोबर त्याला सुख वाटूं लागलें. क्षुधेनें पिडीत झालेल्याला पोटभर जेवण मिळालें कीं, सुखाचा केवढा ढेकर येतो, जे नाहीं म्हणून माणसाला दुःख होते तें त्याला मिळालें कीं सुख होतें. पुत्र नाहीं म्हणून दुःख वाटतें. पुत्र झाल्यावर आनंद वाटतो. मन सुखी होतें. पण कित्येक वेळा शेवटीं कार्टा नसता तर बरें होतें असेंही म्हणण्याची पाळी येते. बेटा आजारी असतो. डॉक्टर असाध्य म्हणतो. पण त्यांतून बरा होतो. मग मनाला केवढा आनंद व सुख वाटतें त्याच्या ! कारण आजारीपणाचें दुःख नाहींसे झालें. मुद्दा काय सुख असें या जगांत तरी कांहीं नाहींच. ज्याप्रमाणांत दुःख

कमी होईल त्या प्रमाणांत सुख झालें असें आपण मानतों. याचा अर्थ असा कीं सुख मिळाल्यानें दुःख कमी होत नाहीं तर दुःख कमी झाल्यानें सुख होतें हें लक्षांत घेऊन माणसानें खरें सुख मिळविण्यासाठीं सुखाच्या मार्गे न लागतां आपली दुःखें कमी करण्याच्या मार्गे लागलें पाहिजे. आपला अध्यात्म हेंच सांगतो कीं दुःखें कमी करा. निदान यापुढें तरी अधिक उत्पन्न करू नका म्हणजे सुखी व्हाल. पण हें व्हायचें कसें ? याचें उत्तर दुःख कसें निर्माण होतें ? हा उपद्व्याप कोण करतो ? या प्रश्नांच्या उत्तरांत आहे. म्हणून त्यांचा आधीं विचार करू. मग सुखाचा मार्ग आपोआप उघड होईल.

आपण व्यवहारी मानव आहोंत. आपलें ऐहिक जीवन जेवढें उंचवतां येईल तेवढे तें उंचावण्याचा व्यवहारी मानव प्रयत्न करतो. शारीरिक, बौद्धिक होईल तेवढी उन्नति करून घेण्याची व्यवहारी मानव पराकाष्ठा करीत असतो. प्रत्येक व्यक्तींत कांहीं ना कांहीं चांगले गुण असतातच. त्यांची वाढ करण्याचा मानव सतत प्रयत्न करीत असतो. या ऐहिक जीवनाला पोषक होईल अशा प्रकारची प्रगति घडवून आणण्याचा व्यवहारी मानव सतत प्रयत्न करीत असतो. पण हें सर्व करतांना तो प्रकृतीच्या पसाऱ्यांतच वावरत असतो. अशा प्रकारचें कार्य हेंहि विश्वशक्तीचें एक कार्य आहे हें खरें. पण तें एक कार्य आहे. दुसरें कांहीं तरी त्याच्या हातांतून निसटलें आहे. तें म्हणजे अध्यात्मिक कार्य. प्रकृतीच्या पसाऱ्या बाहेर नजर टाकून आत्मतत्व वा परमात्मा जाणून घेण्यास व्यवहारीं मानव तयार नसतो. या जांतील बहिर्गत गोष्टीकडे त्याचें लक्ष असतें. यामुळें अंतर्गत गोष्टीकडे त्याचें दुर्लक्ष होते. यामुळें तो सतत द्वंदात सापडून विकार व वासनांच्या आहारीं जातो, यामुळें त्याच्या इच्छा सदैव अतृप्त राहून वखवखलेल्या माणसाप्रमाणें इच्छातृप्तीसाठीं सैरावैरा धावत असतो. ईच्छापूर्तीसाठीं रोज नवे नवे मार्ग शोधण्यांत तो गढलेला असतो. यामुळें त्याच्या मागे सदैव दुःखेंच लागलीं असतात. चिखलांत पाय रुतलेल्या माणसाप्रमाणें स्थिति होते. एक दुःख कमी करायला गेला कीं दुसरें उभें राहते. या ऐहिक जगांत सुख जवा एवढें व दुःख पर्वताएवढें असा त्याला अनुभव येऊन जीवनांतील सुखाचा शोध निरर्थक ठरतो. व्यवहारी मानव ऐहिक जीवनाप्रमाणें अध्यात्मिक जीवनांत वावरण्यास तयार नसतों. यामुळें त्याला आपली दुःखें कमी करतां येत नाहींत व तो सुख मिळवू शकत नाहीं.

दुसरी गोष्ट अशी कीं व्यवहारी मानवाचा निश्चय करतों, शपथ घेतो निष्ठा ऐनवेळीं हे सर्व वारगळतें व वासना नि विकाराच्या आहारी जाऊन आपण नेमके निश्चयाच्या उलट करून बसतो. लहान बालकांची ‘ गट्टी फूं ’ व व्यवहारी माणसाचा निश्चय दोन्हीही सारखीच टिकाऊ असतात. निश्चयाच्या ढिलेपणामुळें आपण आपल

दुःख स्वतः उत्पन्न करीत असतों. कृष्ण, धर्म, अर्जुन एकदां गोष्टी करीत असतां अर्जुनानें कृष्णास प्रश्न केला कीं देवा, आम्हीं पांडव सन्मार्गानें व न्यायानें वागत असतां आमच्या वांट्यास दुःखें येतात, हें कसें ? कृष्णानें उत्तर दिलें कीं याचें कारण निश्चयाचा दुर्बलपणा हें आहे. अर्जुनाला हें पटलें नाहीं व तो म्हणाला देवा, हा अर्जुन दृढनिश्चयी आहे. त्याचा निश्चय कदापिही मोडावयाचा नाहीं. मग माझ्या वाट्याला दुःख कां ? कृष्णानें पाहिलें कीं अर्जुनाची समजूत शब्दानें पटावयाची नाहीं. अनुभवानें ती त्याला पटवून दिली पाहिजे, अर्जुनाच्या गळ्यांत मोत्यांची एक सुंदर माळ होती. कांहीं कारणास्तव त्यानें ती घातली होती व गळ्यांतून कधींही न काढण्याचा त्याचा निश्चय होता. तशी शपथ होती. कृष्णाला हें माहीत होतें. कृष्ण व अर्जुन हे जंगलांतून फिरत असतां त्यांना वाटेंत एक सुंदर सरोवर लागलें. संध्या समय होत आला होता. स्नान करून संध्यादी कर्म उरकून घेतों असें म्हणून अर्जुनानें कपडे काढले व स्नानासाठी सरोवरांत उतरला. दोन चार बुड्या मारल्या व नंतर पहातों तों समोर एक भयानक सिंह आपल्यावर उडी घालण्यास टपलेला त्याला दिसला. आतां बाहेर कसें येणार ? जवळ ना शस्त्र ना अस्त्र. कृष्णही कोठें दिसेना. सिंहाला हाकलणार कसा ? सिंहावर फेकायला कांहींच साधन नाहीं असें पाहून अर्जुनानें आपल्या गळ्यांतील हार काढून तो सिंहावर फेकला. सिंह पळून गेला व अर्जुन काठावर आला. कृष्ण हजर होताच. अर्जुनाच्या गळ्यांत माळ नसलेली पाहून कृष्णानें माळ कोठें गेली म्हणून विचारलें. घडलें तें अर्जुनानें सांगितलें. दुसऱ्या खेपेस ते दोघे उन्हाचे चालले होते. उन्हाच्या तापामुळें अर्जुनाला तृषा लागली. चालून चालून तो अगदीं थकला. व क्षुदार्त झाला. त्याच्यानें चालवेना, कृष्णानें त्याला एका झाडाखालीं बसविलें, मी शेजारच्या गांवांतून कांहीं खाद्य पेय घेऊन येतो. तोंपर्यंत येथून हलूं नकोस असें कृष्णानें त्यास सांगितलें. अर्जुनानें हें कबूल केलें. कृष्ण निघून गेला. थोड्या वेळांत कांहीं अंतरावर त्याला गर्दी दिसली. त्यानें पाहिलें तो कांहीं लोक पुड्या घेऊन कांहीं खात असावे असें त्याला वाटलें. लगेच अर्जुन उठून कसाबसा तेथपर्यंत गेला. एक माणूस पुडभिर चणे व पाणी लोकांना देत होता. अर्जुनानेंही एक पुडी घेऊन चणे खाल्ले व पाणी पिऊन आत्माराम शांत केला. इकडे कृष्ण त्या झाडाखालीं येऊन पहातो तों अर्जुन नाहीं. तेवढ्यांत अर्जुन आला. कृष्ण म्हणाला, 'अर्जुन, तुझा निश्चय किती निर्बल आहे हें आतां तूं समजला असशील मला सखा म्हणतोस मी तुझें सिंहापासून रक्षण केलें नसतें कां ? पण ऐनवेळीं तुझा निश्चय डळमळला निश्चय ढिला पडला व निष्ठा मावळली. हें विश्व मी निर्माण केलें त्यावेळेसच अशी व्यवस्था करून ठेवली आहे कीं, जे कोणी माझ्यावर पूर्ण निष्ठा ठेवतील व जें कांहीं

# योगी अरविंदांचा कर्मयोग.

अज्ञानानें अहंकारपूर्वक केलेली क्रिया म्हणजे कर्म नव्हे, किंवा अहंकाराच्या तृप्ती-साठीं अगर रजोगुणी वासनांच्या वर्चस्वाखालीं केलेलें कृत्य म्हणजे कर्म नव्हे. अहंकार, रजोगुण आणि वासना ही अविद्येचे शिक्कामोर्तब होत. सारांश वरील सर्वांच्या कैदखान्यांतून मुक्त होण्याची बलवत्तर ईच्छा असल्याशिवाय कर्मयोगाचें आचरण अशक्य होय.

परोपकार, मानव समाजाची सेवा किंवा नैतिक व ध्येयवादी मूल्यांचें प्रत्यक्ष आचरण या गोष्टींनाही कर्माचरण म्हणतां येणार नाहीं. हीं सर्व मूल्यें मानवी प्रज्ञेनें उभारलेलीं आहेत. कर्मयोगामधल्या गूढ सत्याची जागा ती घेऊं शकत नाहीं.

केवळ परमात्म्याप्रित्यर्थ आणि जसजशी साधकाची प्रगति होईल त्या त्याप्रमाणें परमात्म्याशीं अधिकाधिक एकरूप होत जाऊन आचरलेलें कर्म म्हणजेच खराखुरा कर्मयोग होय. कर्मयोगाचरणाचा प्रारंभ हा सम्यक दृष्टि नि सम्यक वृत्ति ठेवून सम्यक प्रेरणेनें करावा म्हणजे कालांतरानें त्याची यथायोग्य फळें आपोआप प्राप्त होऊं लागतील.

हें कर्माचरण भक्ति किंवा ज्ञान यांच्या इतकेंच परिणामकारक असतें. वासना, रजोगुण आणि अहंकार यांना अर्धचंद्र दिल्यानें आपलें मन पवित्र नि प्रशांत बनतें. त्या ठिकाणीं अवर्णनीय शांति अवतरते. आपली इच्छाशक्ति ईश्वरार्पण केल्यानें

---

होतंय तें सर्व मी करतोय अशा वृत्तीनें कार्यरत राहून जें कांहीं हातून घडेल तें माझें म्हणून मला समर्पण करतील अशांचा योगक्षेम मी चालवितों. पण सर्वसाधारण मानव हा काम क्रोध लोभ मोह यांच्या पकडींत सांपडलेला व अहंकाराच्या वर्चस्वा-खालीं वावरणारा असतो. यामुळें त्याला माझा विसर पडतो. काम–क्रोध–लोभ हें संकटें आणतात व दुःख निर्माण करतात. अहंकारामुळें निश्चय निर्बल होतो. तो ईश्वरावरील निष्ठा ढिली करतो. जो आपण निश्चय दुर्बल होऊं देत नाहीं व ईश्वरावर अढळ निष्ठा ठेवतो, तिन्ही ब्रह्मांडे एकत्र कडाडली तरी जो आपल्या निश्चयापासून ढळत नाहीं तो या जगांत सुखी होतो. निश्चयाचा दुर्बलपणा व हरिस्मरणाची विस्मरता यामुळें संकटें व दुःख निर्माण होत असतात यामुळें अर्जुना, सुखी होण्याचा खरा मार्ग म्हणजे परमेश्वरावर दृढ श्रद्धा व विश्वास ठेवून त्याचें सतत स्मरण करणें हा होय.

किंबहुना ती ईश्वराच्या ईच्छाशक्तिमध्यें विलीन केल्यानें आपला अहंकार लोप पावतो आणि आपल्याला विश्वात्मकता अगर विश्वातीत निर्गुण ब्रम्ह्याशीं तादात्म्यता प्राप्त होते. प्रकृति नि पुरुष वेगवेगळी आहेत याची आपल्याला प्रतीति येऊन बाह्य प्रकृतीच्या बेडींतून आपण मुक्त होतो. आपल्याला आपल्या अंतस्थ पुरुषाची जाणीव आपला बहिर्गत अहंकारी पुरुष हा आपल्या अंतस्थ पुरुषाचे केवळ साधन यंत्र आहे असें ज्ञान प्राप्त होते. आपण जी कर्मे करतो ती खरोखरच आपण करीत नसून विश्वशक्ति ही करीत असल्याचा प्रत्यय येतो व आपला आत्मा अतःपुरुष हा केवळ द्रष्टा वा साक्षी असल्याचा आपल्याला साक्षात्कार होतो. आपल्या अंतःकरणाच्या मागे राहून नियमन आणि क्रिया करणारी परम ईशशक्ति ही आपल्या हातांतून सर्व कामे काढून घेऊन ती सर्व आपण स्वतः करीत असल्याचा अनुभव येतो. आपली ईच्छाशक्ति व आपली सर्व कर्मे आपण सतत ईश्वराला वाहीत राहिल्यानें आपले ईश प्रेम आणि उपासना ही वृद्धिंगत होतात आणि आपला अंतर्गत चैत्य पुरुष हा आपल्या बाह्य-पृष्ठभागीं येऊन स्थित होतो. आपल्यावर वावरत असलेल्या शक्तीची जाणीव सतत ठेवल्यानें त्या शक्तीचें साक्षात् दर्शन होऊं लागते. तो आपल्यामध्यें अवरोह करीत असल्याचा आपल्याला प्रत्यय येतो. श्रेष्ठ प्रज्ञेचे नि ज्ञानाचें द्वार आपल्यासाठीं खुलें झाल्याचें आढळून येते. परिणामीं कर्म भक्ति आणि ज्ञान यांचा संगम होऊन आपण पूर्णावस्थेप्रत पावतो. या अवस्थेला मानवाचे अध्यात्मिक परिवर्तन असें संबोधिलें जाते. अरविंद म्हणतात कीं आपला हा कर्मयोग म्हणजे गीताप्रणीत कर्मयोगाचा संपूर्ण अध्यात्मिक जीवन प्राप्तीसाठीं घडवून आणलेला विकास होय. तो आपण तर्क आणि कल्पना शक्ति यावर आधारलेला नसून साक्षात् अनुभूतीवर उभारलेला आहे. यांत भक्तीचा अंतर्भाव तर आहेच किंबहुना भक्ति हीच या योगाचा आत्मा होय. मात्र जीवनपराङ्मुख भावना व्यतिरिक्त भक्तीचा वा निर्भेळ तत्त्व चिंतनाचा किंवा ध्यानाचा या योगांत समावेश होऊं शकत नाहीं.

# श्रीगुरुपौर्णिमा उत्सव शके १८८८

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणी—श्रीसाईबाबामहाराज मु. शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांचा श्रीगुरुपौर्णिमा उत्सव शिर्डी येथें सालाबादप्रमाणें दिनांक १—७—६६ शुक्रवार ते दिनांक ३—७—६६ रविवारपावेतों तीन दिवस साजरा झाला.

उत्सवाकरितां मुंबई, पुणें, नागपूर, मराठवाडा, खानदेश, वऱ्हाड, मद्रास, म्हैसूर, आंध्र, मध्यप्रदेश वगैरे लांवलांबचे भक्तलोक कुटुंबांतील मुलांबाळांसह सद्गुरुसाईबाबांचे दर्शनासाठीं आले होते.

उत्सवाचा कार्यक्रम दिनांक १।७।६६ शुक्रवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यातिरिक्त पहांटे सहा वाजतां श्रीसाईंच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, चौघडा, ब्यांड, भजनी टाळ—मृदंग, लेजिम, चोपदार—भालदार अशा लवाजम्यानिशी मंदिरांतून गुरुपादुका मार्गानें श्रीद्वारकामाईत गेली, तेथें उत्सव मूर्तीची स्थापना व अखंड साईसच्चरित्र चोवीस तास पोथी वाचन चालू झालें—त्यानंतर श्रींचे मंगल स्नान, वस्त्रार्पण, पुष्पार्पण, भक्तांचे अभिषेक पूजन व प्रसादरूपानें श्रींचे कपड्यांची विक्री दुपारी ४ ते ६॥ पर्यंत, श्रींचे समाधीमंदिरांत संस्था गवई विठ्ठलराव मराठे यांचें कीर्तन रात्रौ ९। ते ११ पर्यंत. गांवांतून श्रींचे पालखीची मिरवणूक टाळ—मृदंग भजन, गारूड—भारूड, चौघडा बँड, लेझिम, ताशा, छडिदार, चोपदार वगैरे लवाजम्यासह मिरवणूक निघाली होती. त्यानंतर शेजारती झाली.

दिनांक २।७।६६ शनिवार रोजीं पहांटे नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुपादुका मार्गानें श्रींचे मंदिरांत लवाजम्यासह येऊन समाप्त झाली. त्यानंतर श्रींचे समाधीस गंगा—गोदावरीचे जलानी मंगलस्नान, वस्त्रार्पण, पुष्पार्पण झाले. नंतर भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजन, माध्यान्यआरती, तीर्थप्रसाद दुपारीं ४ ते ६॥ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे ( गुरुपौर्णिमा ) या विषयावर कीर्तन झालें. रात्रौ श्रींचे रथाची मिरवणूक गांवांतून बॅन्ड, सूरसनई, चौघडा, टाळ—मृदुंग भजनी दिंडी, लेझिम, ताशा, गारुड, भारुड वगैरे झाले. त्यानंतर रात्रभर (जागर) मंदिर भक्तांना दर्शनासाठीं खुलें होतें व कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. प्रत्येक कलाकारास संस्थानतर्फे संभावना एक रुपया व नारळ प्रसाद देण्यांत आला.

कलाकारांची संख्या ३४ होती. यांत विशेष कलाकार मुंबई येथील श्री. स्नेहल भाटकर (संगीत भजन) व तबलजी— श्री. नरसू भाये मुंबई या दोघांनीं फारच उत्तम भजनें गाऊन रंग भरून टाकला. श्रोते आनंदानीं डोलू लागले. दुसरे कलाकार श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर कसबा पेठ पुणें यांनीं (गारुड-भारुड) उत्तम गायिले. तिसरे कलाकार श्री. वसंतराव देवळणकर पुणें सनई वादन तसेंच श्री. दामुअण्णा दळवी श्रीरामपुर सनईवादन व कोपरगांव येथील श्री. बाबुराव नरोडे व श्री. गजानन-शास्त्री जोशी (भजनें) गाईली. बाकी सर्व कलाकार स्थानिक व जवळपासचे होते. याप्रमाणें जागर पहांटे ६ वाजेपर्यंत झाला.

दिनांक ३–७–६६ रविवार रोजीं सकाळीं—नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजन— प्रसादरूपानें कपड्यांची विक्री व १०॥ ते १२ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे गोपाळकाला कीर्तन, दहीहंडी खेळ, फुगड्या वगैरे होऊन नंतर माध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद होऊन उत्सव समाप्त झाला.

या उत्सवाची व्यवस्था मे. माननीय कोर्ट रिसीव्हर भा. ग. पोतनीस साहेब (श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी) यांचे देखरेखीखाली खातेप्रमुखानीं चोख ठेवली होती. उत्सवाकरितां मुद्दाम मांडव, कमानी, ध्वजतोरणें वगैरेनी सुशोभित केले होते. तसेच विद्युत्‌दीपाची रंगीबेरंगी रोषनाई कळसावर व इतर ठिकाणीं केली होती. भक्तांना उतरण्यासाठीं सर्व जागा डी. डी. टी. नें धुऊन स्वच्छ करणेत आल्या होत्या; तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था औषधे टाकून स्वच्छते-बद्दल विशेष खबरदारी सॅनिटेशन् खात्याने घेतली होती. तसेच स्नानाची व भोजनाची व्यवस्था उत्तम होती. तीन दिवस भक्तांना नेहमींचे दरात पक्वान्नाचें भोजन देण्यांत आले. गरिबांना अन्नदान देण्यांत आलें. पोलीस बंदोबस्त उत्तम होता. त्यामुळें चोऱ्यामाऱ्या कांहीं झाल्या नाहींत. सर्व संस्थान नोकर, सेवेकरी, सन्माननीय पाहुणे यांना तीन दिवस संस्थानतर्फे (चहा व फराळ) देण्यांत आला. संस्थान सर्व नोकर सेवेकऱ्यांना एक दिवस मिष्टान्नाचें जेवण देण्यांत आलें. भोजनाची व्यवस्था साई संस्थानच्या भोजनगृह कॉन्ट्रॅक्टर यांनीं केली व स्नानाची व्यवस्था साई संस्थानच्या बाथरुम कंट्राटदार यांनीं केली. येणेंप्रमाणें गुरुपौर्णिमा उत्सव उत्तम-प्रकारें साजरा झाला.




# जून १९६६

चालू महिन्यांत भक्तांचीं गर्दी नेहमीप्रमाणें होती. कांहीं कलाकारांनी श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें.

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. श्रीपादराव जमखंडी. ( श्रीसाईसमाज हुबळी ) हुबळी म्हैसूर प्रांत श्री. ह. भ. प. शंकर महादेव कुंटे, ठाणे. श्री. ह. भ. प. सिद्धेश्वर बळवंत इनामदार, ठाणे. संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें झालीं.

**गायन**

श्री. बाळकृष्ण गोविंद परांजपे, पुणे श्री. तुकाराम दणाणे, मुंबई. श्री. प्रभाकर जयकर कांदिवली, श्री. प. स. महाजनी, मुंबई. श्री. पांडुरंग पुरुषोत्तम जोशी. ( ग्वालीयर ) श्री दत्तुसिंग लोधी रजपूत हैद्राबाद ( डेक्कन ) श्री. भार्गवराम साळुंके सावळी श्री. सौ. आशा शांताराम म्हात्रे, घाटकोपर. सौ. शरयू मराठे, श्रीरामपूर.

**तबला वादन**

श्री. जव्हाहर एस. मर्चंट मुंबई, श्री. एकनाथ परशराम पिंपळे, मुंबई.

**नृत्य**

कु. आशा बाळकृष्ण प्रधान, बोरिवली, मुंबई ६

**मोठ्यांच्या भेटी**

( १ ) मे. ना. रघुरामैय्यासाहेब पुरवठामंत्री भारत सरकार न्यू दिल्ली.

( २ ) मे. ना. त्र्यं. शि. भारदेसाहेब सभापती महाराष्ट्र विधान सभा, मुंबई.

( ३ ) मे. के. एच. नागरानी जज, मुंबई.

( ४ ) मे. डी. बी. देसाई जज, सिटी सिव्हील कोर्ट, अहमदाबाद.

( ५ ) मे. एम्. डब्ल्यू. देसाईसाहेब इंडस्ट्रिज कमिशनर महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(६) मे. एस. जी. वालावलकर स्मॉलसेव्हींग डायरेक्टर महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(७) मे. असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस, हैद्राबाद (डे.)

(८) मे. व्ही. आर. तळाशीकर सेशन्स जज्जसाहेब, अहमदनगर.

**भजन कार्यक्रम**

आषाढी महाएकादशीनिमित्त श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक, गारुड भारुड व (कीर्तन) असा कार्यक्रम झाला.

संस्थान नोकर भजन मंडळाचा कार्यक्रम (एक) झाला. मे. सन्मानयीय कोर्ट रिसिव्हर भा. ग. पोतनीससाहेब यांनीं हजर राहून भजनांत भाग घेतला.

**हवा-पाणी**

हवा उष्ण, पाऊस अद्याप नाहीं, पावसाची अत्यंत जरूर आहे. इतर रोगराई कांहीं नाहीं.




## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह (स्टॅंप-तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | श्रीसाईसच्चरित्र | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ४–५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४–०० |
| ( ५ ) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| ( ६ ) | Glimpes of Indian Spirituality– | | by Pradhan | १-०० |
| ( ७ ) | Glimpes of Indian Spirituality | ( Telgu ) | | १–०० |
| ( ८ ) | श्री साईलीलामृत | ( मराठी ) | श्री. आगाश्करकृत | २–०० |
| ( ९ ) | साईबाबा-अवतार व कार्य | ( मराठी ) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | ( गुजराथी लिपीत ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | श्री साई-सुमनांजली | ( मराठी १०८ नांवें ) | | ००–०६ |
| (१५) | कीर्तन पंचक | ( मराठी ) | श्री. देव | १–५० |
| (१६) | शीलधी | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१७) | श्री साईगीतांजलि | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१८) | Guide to Shirdi | ( English ) | | ००–१२ |
| (१९) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | ( मराठी ) | | ००–२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| ( 1 ) | Baba sitting on Stone 9½" X 13½" medium | 00-37 |
| ( 2 ) | ,, ,, in Dwarkamai 9½" X 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi, Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४:

Regd. No. M. H. 5



★

संगीताची मोहि
माणसाला मंत्रमुग्ध करे
त्याचप्रमाणें कुठल्या
हृदयंगम चित्राची मुद्रणक
वाचकाला नयनमुग्ध करे

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,

ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि

आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण

सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

**५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई**

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: ग. कृ. खापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४
संपादक व प्रकाशक: बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर